सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ०७ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ११४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## सावजी विदर्भाची शान, रेस्टॉरंट्स बंद पडतील असे बोलू नका! : मंत्री बावनकुळे

### मुंढेंच्या 'सावजी मटण' विधानावर प्रतिक्रिया



**मुंबई :** "सावजी हा व्यवसाय विदर्भाची शान आहे. हजारो कुटुंबांचा हा रोजगाराचा आधार असून, व्यवसाय बंद पडेल किंवा या उद्योगाला बळीचा बकरा बनवले जाईल अशी कोणतीही विधाने अधिकाऱ्यांनी करू नयेत," असा सल्ला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी दिला. अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी मटणाबाबत केलेल्या विधानाचा समाचार घेत महसूल मंत्र्यांनी सावजी व्यवसायाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका मांडली आहे.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अमरावती येथील एका कार्यक्रमात "मी जर हे सावजी मटण खाल्ले, तर महिनाभर आजारी पडेन आणि हॉस्पिटलमध्ये जावे लागेल," असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या विधानामुळे सावजी रेस्टॉरंट चालकांमध्ये असंतोष पसरला होता. या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी बोलताना महसूल मंत्री बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांच्या अशा वक्तव्यांवर आक्षेप नोंदवला.

बावनकुळे म्हणाले, विदर्भामध्ये गेली तीन-चार पिढ्यांपासून सावजी रेस्टॉरंट्स अत्यंत प्रामाणिकपणे सुरू आहेत. सावजी ही मसाला आणि अन्नपदार्थ बनवण्याची एक आगळीवेगळी आणि पारंपरिक पद्धती आहे. विदर्भात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सावजीच्या जेवणाचा आस्वाद घ्यावासा वाटतो, इतकी या अन्नाची लोकप्रियता आहे. हे खास मसाले इतर कोणीही बनवू शकत नाही. आज जगातल्या अनेक देशांमध्ये सावजीच्या पदार्थांना मोठी मागणी असताना, एका अधिकाऱ्याने संपूर्ण उद्योगावर अशी सरसकट आणि नकारात्मक टिप्पणी करणे पूर्णपणे अयोग्य आहे.

महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले की, अन्नात कुठे भेसळ किंवा आरोग्याला धोका निर्माण करणारी गोष्ट आढळल्यास त्या विशिष्ट ठिकाणी कारवाई करण्यास कोणाचीही अडचण नाही. परंतु, संपूर्ण सावजी व्यवसायाला लक्ष्य करणे चुकीचे आहे. या व्यवसायाला फटका बसेल किंवा रेस्टॉरंट्स बंद पडतील, अशा स्वरूपाची वक्तव्ये अधिकाऱ्यांनी टाळावीत, असा सल्ला बावनकुळे यांनी दिला.

## जळगाव बायपास प्रकरणी मोठी कारवाई ! नितीन गडकरींचे चौकशीचे आदेश, दोषी ठेकेदार होणार ब्लॅकलिस्ट

**नागपूर :** सुरत–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाळधी ते तरसोद बायपासच्या रेल्वे उड्डाणपूलाच्या भरावाचा काही भाग खचल्याच्या गंभीर घटनेची दखल अखेर केंद्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी (Minister Nitin Gadkari) यांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून, दोषी आढळणाऱ्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याचे आणि संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.



**दोषी ठेकेदार होणार ब्लॅकलिस्ट**

सुरत–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाळधी ते तरसोद बायपासवरील रेल्वे उड्डाणपुलाच्या भरावाचा काही भाग अचानक खचल्याने या प्रकल्पाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. घटनेनंतर खासदार स्मिता वाघ यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली होती. यानंतर खासदार स्मिता वाघ यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

त्यांच्या निवेदनाची गंभीर दखल घेत केंद्रीय मंत्री गडकरी (Minister Nitin Gadkari) यांनी तातडीने उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले. चौकशीत संबंधित कंत्राटदार दोषी आढळल्यास त्याला तात्काळ ब्लॅकलिस्ट करण्यात येणार असून, या कामासाठी जबाबदार अधिकारी आणि संबंधित व्यक्तींवरही कठोर प्रशासकीय कारवाई केली जाईल, असे स्पष्ट निर्देश केंद्रीय मंत्र्यांनी दिले आहेत. निकृष्ट दर्जाची कामे कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे.

**दोषींवर कोणती कारवाई होणार ?**

दरम्यान, बायपासवरील भराव खचल्याच्या घटनेनंतर राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन , जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील (Minister Gulabrao Patil), आमदार सुरेश भोळे (MLA Suresh Bhole) , महापौर दीपमाला काळे (Mayor Deepmala Kale), जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला होता. या संपूर्ण प्रकरणानंतर राष्ट्रीय महामार्गावरील कामांच्या गुणवत्तेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चौकशी अहवालात नेमके कोण जबाबदार ठरतात आणि दोषींवर कोणती कारवाई होते, याकडे आता जळगावसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची 1,053 एकर वनजमीन सुरक्षित!

### बावनकुळेंच्या निर्णयाने वन विभागाचा हक्क कायम

**मुंबई :** संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या (Sanjay Gandhi National Park forest) महत्त्वाच्या वनक्षेत्राबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. घोडबंदर मार्गावरील भाईंदरपाडा-ओवळे येथील १ हजार ५३ एकर वनजमिनीवरील वन विभागाचा हक्क कायम ठेवण्यात आला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या अंतिम आदेशामुळे ही जमीन खासगी हस्तांतरणापासून सुरक्षित झाली आहे. या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर 'महाराष्ट्र शासन राखीव वने' तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांची नोंद कायम ठेवण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे संबंधित परिसरातील हरित पट्टा अबाधित राहणार असून, अनिर्बंध विकास आणि मोठ्या बांधकामांना आळा बसणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल वनमंत्री गणेश नाईक यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे (Chandrashekhar Bawankule) यांचे अभिनंदन केले. "वनाची जमीन वनासाठीच राहिली पाहिजे, ही राज्य सरकारची भूमिका या निर्णयातून पुन्हा स्पष्ट झाली आहे," असे बावनकुळे यांनी सांगितले.

**खासगी नावे दाखल करणारी फेरफार नोंद रद्द :**

घोडबंदर मार्गावरील भाईंदरपाडा (ओवळे) येथील जुना सर्व्हे क्रमांक २९१ पैकी (नवीन सर्व्हे क्र. २२/१, २२/४, २२/५) आणि जुना सर्व्हे क्र. २९७ पैकी (नवीन सर्व्हे क्र. २१) अशी एकूण १,०५३ एकर जमीन १९७५ पासून वन विभागाच्या ताब्यात आहे. या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर यापूर्वीपासून 'महाराष्ट्र शासन राखीव वने' अशी नोंद होती. मात्र, खासगी खातेदारांची नावे दाखल करणारी फेरफार नोंद क्र. ९७५ वादग्रस्त ठरली होती. या नोंदीमुळे जमीन खासगी व्यक्तींकडे जाण्याचा मार्ग खुला झाला होता.

## नाशिकच्या 'या' तालुक्यांमध्ये पुन्हा भूकंपाचे धक्के; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**नाशिक :** नाशिकमधील सुरगाणा, कळवण आणि पेठ या तालुक्यांमध्ये गुरुवारी पुन्हा भूकंपाचे धक्के बसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सुरगाणा तालुक्यातील वाझुळपाडा, बोरगाव, सराड, घागबारी, हरणटेकडी, रोटी आणि शिंदे दिगरसह आसपासच्या परिसरात गुरुवारी दिवसभरात भूकंपाचे सलग पाच सौम्य धक्के (Earthquake Tremors) जाणवले आहे.

सुरगाण्यात पाच भूकंपाचे धक्के


**सकाळी** ५:४१ वाजता: ३.० रिश्टर स्केल

**सकाळी** ७:०९ वाजता: ३.० रिश्टर स्केल

**सकाळी** ८:५८ वाजता: २.७ रिश्टर स्केल

**दुपारी** २:५६ वाजता: २.८ रिश्टर स्केल

**दुपारी ३**:३८ वाजता: ३.६ रिश्टर स्केल (दिवसातील सर्वाधिक तीव्रतेचा धक्का)



कळवण, पेठही भूकंपाच्या धक्क्याने हादरले

**तर कळवण तालुक्यातील (Kalwan) दळवट आणि पेठ तालुक्यातील (Peth) आसरबारी परिसरात दुपारी ३**:३८ मिनिटांनी भूकंपाचे धक्के बसले आहेत. सध्या या सर्व भागांमधील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून, नागरिकांनी घाबरून न जाता कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शांतता राखावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सुदैवाने या धक्क्यांमुळे कोणतीही जीवितहानी किंवा मोठे नुकसान झाले नसले, तरी प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवून सतर्कतेचा इशारा दिला आहे.

दरम्यान, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन भूकंपाची नेमकी तीव्रता, केंद्रबिंदू आणि त्यामागील तांत्रिक कारणांची सविस्तर तपासणी करण्यासाठी नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी दिल्ली येथील विशेष तज्ज्ञ पथक तातडीने नाशिकमध्ये दाखल झाले आहे. हे पथक बाधित भागांची पाहणी करून आपला सविस्तर अहवाल सादर करणार आहे.



This pictorial representation of map of India does not purport to be the political map of India. Map not to scale.

ENHANCING MOBILITY
AS ONE OF INDIA'S LEADING ELECTRICAL AND ELECTRONICS COMPANIES.

As an *established leader in automotive solutions,* we are delivering continued growth and value.

- One of India's leading electrical & electronics (E&E) companies.*
- One of India's top 2 players in wiring harnesses for two & three wheelers.*
- A diversified presence across multiple end markets, including commercial vehicles, off-highway vehicles, farming & industrial equipment.
- 22 manufacturing facilities, 3 engineering and design support centers & 7 warehouses across India and globally.**
- Providing access to major automotive clusters both in India & the world over.

*Source: CRISIL Report | ** As of March 31, 2026

DHOOT TRANSMISSION
Harnessing Safety, Electrifying The Future
Dhoot Transmission Limited
www.dhoottransmission.com

**DHOOT TRANSMISSION LIMITED**, is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offering of its Equity Shares and has filed the RHP dated August 3,2026 with the RoC. The RHP and Abridged Prospectus shall be available on the website of SEBI at www.sebi.gov.in, as well as on the websites of the Stock Exchanges i.e. BSE and NSE at www.bseindia.com and www.nseindia.com, respectively, on the website of the Company at www.dhoottransmission.com and on the websites of the BRLMs, i.e. Axis Capital Limited, Jefferies India Private Limited, Kotak Mahindra Capital Company Limited, Nomura Financial Advisory and Securities (India) Private Limited, SBI Capital Markets Limited and 360 ONE WAM Limited at www.axiscapital.co.in, www.jefferies.com, https://investmentbank.kotak.com, www.nomuraholdings.com/company/group/ asia/india/index.html, www.sbicaps.com and www.360.one, respectively. Any potential Bidders should note that investment in equity shares involves a high degree of risk and for details relating to such risk, see "***Risk Factors***" on page 24 of the RHP. Potential Bidders should not rely on the UDRHP-I filed with SEBI and the Stock Exchanges for making any investment decision and should instead rely on the RHP, when filed, for making an investment decision.
The Equity Shares offered in the Offer have not been and will not be registered under the United States Securities Act of 1933, as amended (the "**U.S. Securities Act**") or any other applicable law of the United States and, unless so registered, may not be offered or sold within the United States except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act and applicable state securities laws. Accordingly, the Equity Shares are being offered and sold (a) within the United States only to persons reasonably believed to be "qualified institutional buyers" (as defined in Rule 144A under the U.S. Securities Act and referred to in the RHP as "**U.S. QIBs**"; for the avoidance of doubt, the term "**U.S. QIBs**" does not refer to a category of institutional investor defined under applicable Indian regulations and referred to in the RHP as "QIBs") in transactions exempt from, or not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act; and (b) outside of the United States in offshore transactions as defined in and in compliance with Regulation S under the U.S. Securities Act ("**Regulation S**") and the applicable laws of the jurisdiction where those offers and sales are made.
It is to be distinctly understood that the permission given by Stock Exchanges should not in any way be deemed or construed that the Offer Document has been cleared or approved by Stock Exchanges nor does it certify the correctness or completeness of any of the contents of the Offer Document. The investors are advised to refer to the Offer Document for the full text of the Disclaimer Clause of NSE and BSE Limited.

Adfactors 230/26 C

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १० वर्षांपासून फरार आरोपीला अटक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : पोलीस ठाणे एमआयडीसी, लातूर येथे गुन्हा क्र. ३८/२०१६ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी सुग्रीव गिरजप्पा बंडगर (वय ३९ रा. भातांबी, ता. तुळजापूर) हा २०१६ पासून फरार होता. न्यायालयात वारंवार अनुपस्थित राहत असल्याने त्याच्याविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २९९ अन्वये कार्यवाही करण्यात आली होती. फिर्यादी हे एका वित्तीय संस्थेमध्ये शाखाधिकारी म्हणून कार्यरत असताना आरोपींनी बनावट कागदपत्रे व खोटी माहिती सादर करून वाहन कर्ज मंजूर करून घेतले. वाहन तारणाशी संबंधित कागदपत्रांमध्ये बनावटपणा करून वित्तीय संस्थेची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही बाब उघडकीस आल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी मूळ गावाच्या परिसरात येणार असल्याची माहिती पथकातील पोलीस हवालदार दत्तात्रय शिंदे यांना मिळाली. पथकाने तात्काळ सापळा रचला व आरोपीला शिताफीने ताब्यात घेऊन एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावली. सदरची कारवाई वरीष्ठांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, विनोद चलवाड, श्रीनिवास जांभळे यांनी केली आहे.



## विविध वृत्त.....

### शिवराज पाटील यांच्या स्मारकाबाबत काँग्रेस पक्ष चाकूरकर परिवाराच्या सूचनांचा करणार सन्मान



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार, दि. ५ ऑगस्ट रोजी देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पुतळ्याच्या संदर्भाने महापौरांसह शिष्टमंडळाने 'देवघर' या निवासस्थानी शैलेश पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या संदर्भात चाकुरकर परिवाराच्या सूचनांचा सन्मान केला जाणार आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे,

सभागृह नेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर व माजी अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. किरण जाधव यांनी 'देवघर' या निवासस्थानी शैलेश पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. चाकूरकर परिवारांच्या दिशानिर्देशांचे पालन लातूर शहर महानगरपालिका करेल, असे महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांनी आश्र्वस्त केले. येत्या चार दिवसांमध्ये परिवारांच्या सर्व सदस्यांशी चर्चा करून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

## सत्ताधारी - विरोधकांच्या वादात लातूरच्या विकासाचे होणार ' तीनतेरा' ?

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ ऑगस्ट : बुधवारी पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेला अभूतपूर्व गदारोळ आणि गोंधळ पाहून भविष्यात सत्ताधारी काँग्रेस आणि विरोधी बाकावरील भाजपा यांच्यातील वादात चक्क लातूरच्या विकासाचे ' तीनतेरा' होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसात लातूरकरांना आपण काँग्रेसच्या हाती मनपाची सूत्रे सोपवूनमोठी घोडचूक तर केली नाही ना ? असा प्रश्र्न पडल्यास नवल वाटू नये.लातूर शहर मनपाच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत लातूरच्या मतदारांनी केंद्र आणि राज्यात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पार्टी - महायुतीला डावलून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसवर विश्र्वास दाखविला होता. अनपेक्षितपणे मनपा निवडणुकीत काँग्रेस दोन तृतीयांशापेक्षाही अधिक जागा जिंकण्यात यशस्वी ठरली. लातूरच्या या निकालाचे अनेकांना आश्र्चर्य आणि कौतुकही वाटले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सत्ताधारी भाजप महायुतीच्या हाती मनपाच्या सत्तेच्या चाव्या मतदार सोपवतील असा सर्वांचा कयास होता. पण, काहीतरी वेगळे करणार नाहीत तर ते लातूरकर कसे ? जणू याच कारणावरून सत्ता काँग्रेसच्या हाती सोपविली गेली असावी. लातूर शहर मनपाची सर्वसाधारण सभा बुधवारी आयोजित करण्यात आली होती. या सभेत एकूण २८ विषय चर्चेला घेण्यात येणार होते. या सभेत शहराच्या बोधे नगर परिसरात झालेल्या दुर्घटनेत खड्ड्यातील पाण्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या दोन बालकांच्या कुटुंबियांना दहा लाखांची आर्थिक मदत देण्याचा विषय सोडता बाकी एकाही विषयावर प्रत्यक्षातचर्चा होऊ शकली नाही.देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री तथा लातूर नगर परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मारकाच्या मुद्द्यावरूनहीसत्ताधारी आणि विरोधी सदस्यातचांगलीचबाचाबाची झाली. मनपा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या निधीतून मनपा आवारात चाकूरकरांचे स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. मात्र, मनपातकाँग्रेसची सत्ता आल्यानंतर आणि चाकूरकर काँग्रेस पक्षाचेच ज्येष्ठ नेते असतानाही काँग्रेस नेतृत्वाने त्यांचा पुतळा मनपा आवाराऐवजी आदर्श कॉलनी परिसरात उभारण्याचा प्रयत्न केल्याचे भाजप सदस्यांचे म्हणणे होते. या कारणावरून सभागृहात बराच वाद चालला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी पुतळ्या उभारणीच्या कामातही सत्ताधारी काँग्रेस हेतुतः उशीर करत असल्याचा आरप केला गेला. या पुतळ्याच्या उभारणीसाठी शासनाकडून दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही हा प्रकार चालू असल्याबद्दल विरोधकांनी नाराजी व्यक्त केली.शहराच्या विकासासाठी काही किरकोळ अपवाद वगळता सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनी एकत्रित येणे अतिशय आवश्यक असते. विरोधासाठी विरोध करण्याचे धोरण दोहोंनीहीकटाक्षाने टाळलेपाहिजे. तात्विक मुद्द्यावर मतभेद असणे साहजिक आहे. पण, नाहकविरोधासाठी विरोध ही भूमिका सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही ठेवता कामा नये,अशा प्रतिक्रिया काल सर्वसाधारण सभेत झालेल्या वादावादीचा विषय सामान्य लातूरकरांच्या कानावर आल्यानंतर व्यक्त होत असलेल्या ऐकायला मिळाल्या. शहराचा विकास साधायचा असेल तर सत्ताधारी काँग्रेसनेही विरोधी भाजप सदस्यांना विश्र्वासात घेऊन चालणे गरजेचे आहे. अन्यथा दोघांच्या वादात लातूरच्या विकासाचे अक्षरशः ' तीनतेरा' झाल्याशिवाय राहणार नाहीत,असे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येत आहे. दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी आपआपल्या पक्षाच्या सदस्यांना शहराच्या विकासाच्या मुद्द्यावर तरी किमान हातात हात घालून काम करण्याचा सल्ला दिला पाहिजे,असे दिसून येत आहे.



## पिके फवारणीची कामे सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : लातूर जिल्ह्यात खरीप हंगामात शेतकऱ्यांनी तुर, मुग, उडीद, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका आदी पिकांचा पेरा केला आहे. ज्या शेतकऱ्यांनी सुरूवातीला पेरण्या केल्या आहेत. या पिकांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी शेतकरी फवारण्या करत आहेत. सध्या पावसाची तुरळक ठिकाणी हजेरी दिसून येत आहे.

सध्या शेतकरी पिकांच्या अंतर्गत मशागतीमध्ये व्यस्त आहे. लातूर जिल्ह्यात पिकांच्या वाढीसाठी दमदार पावसाची गरज आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्नही मार्गी लागणार आहे.

## शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : लातूर शहरात विकासाच्या नावाखाली चांगल्या स्थितीत असलेले रस्ते खोदून ठेवले आहेत. पावसाच्या सरी कोसळल्यानंतर या रस्त्यावरून दुचाकी घेऊन जाणे जिकीरीचे होत आहे. तसेच चालतानाही नागरीकांना कसरत करून चालावे लगत आहे. अनेक ठिकाणी चिखलातून नागरीकांना वाट सर करावी लागत आहे.

रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने त्यात पाणी साचत असल्याने वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने अचनकपणे आपघात घडत आहेत. नागरीकांना या रस्त्याच्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

## मांजरा साखर कारखान्याच्या यशाबद्दल सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांचा धिरज देशमुख यांनी केला सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या यशाबद्दल कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचा सत्कार लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी केला.

विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याला द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचा 'बेस्ट शुगर फॅक्टरी २०२६' विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच १०० टक्के ऊसतोड हार्वे स्टरद्वारे करणारा देशातील पहिला साखर कारखाना हणून मांजरा साखर कारखान्याने नवा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मांजरा परिवाराचे मार्गदर्शक, सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा रेणा साखर कारखाना येथे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी सत्कार केला. यावेळी राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, रेणा कारखान्याचे चेअरमन अनंतराव ठाकूर-देशमुख, माजी चेअरमन सर्जेराव मोरे, व्हाईस चेअरमन प्रवीण पाटील, रणजित पाटील, कार्यकारी संचालक बी. व्ही. मोरे, सचिव रविशंकर बरमदे आदींची उपस्थिती होती.

मांजरा साखर कारखान्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत ऊसतोडणीची प्रक्रिया हार्वेस्टरच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा उपक्रम राबविला. ऊसतोडणीसाठी मजुरांची कमतरता, वाढते ऊस क्षेत्र आणि गाळप हंगामातील विलंब यावर प्रभावी उपाय म्हणून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनातून सुरू झालेल्या या उपक्रमाला शेतकरी आणि तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी व होतकरू तरुणांना हार्वेस्टर खरेदीसाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांनी हार्वे स्टर खरेदी करून ते साखर कारखान्याच्या ऊसतोडणीसाठी उपलब्ध करून दिले. परिणामी, २०२५-२६ च्या गाळप हंगामात ८० हार्वेस्टरच्या माध्यमातून कारखान्याची १०० टक्के ऊसतोडणी पूर्ण करण्यात आली.

सहकार, शेतकरी हित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत मांजरा साखर कारखान्याने मिळविलेले हे यश संपूर्ण साखर उद्योगासाठी दिशादर्शक ठरले असून, या कामगिरीबद्दल राज्यभरातून मांजरा परिवाराचे कौतुक होत आहे.

## 'दयानंद वाणिज्य 'मध्ये 'स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम'

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील वाणिज्य विभागाच्या वतीने सोमवारी बी.कॉम. व एम. कॉम. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम' उत्साहपूर्ण वातावरणात दयानंद सभागृहात संपन्न झाला. नवीन विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन जीवनात स्वागत करत त्यांना उच्च शिक्षण, करिअर नियोजन, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगाराभिमुख कौशल्यांची माहिती देण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत मान्नीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून शशिकांत बोराळकर, रमेश गुप्ता व अमित अग्रवाल, डॉ. मनीषा आष्टेकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात केवळ पदवी पुरेशी नसून संवाद कौशल्य, डिजिटल स्किल्स, नेतृत्वगुण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवण्याची गरज अधोरेखित केली. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच कौशल्यविकासावर भर दिल्यास रोजगाराच्या विविध संधी सहज उपलब्ध होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. यावेळी साईनाथ उमाटे, डॉ. अशोक वाघमारे, डॉ. विठ्ठल जाधव, प्रा. दगडू शेख, प्रा. योगेश शर्मा यांनी आपल्या विभागाची थोडक्यात माहिती दिली.

प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थित तज्ज्ञांशी संवाद साधला. करिअर मार्गदर्शन, उद्योग क्षेत्रातील संधी आणि कौशल्यविकासाविषयी विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित हा इंडक्शन कार्यक्रम त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनिषा आष्टेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. लता जाधव यांनी केले. प्रा. ऐश्र्वर्या कुलकर्णी यांनी आभार मानले.

## क्किक हिल फाऊंडेशन तर्फे सुरक्षित इंटरनेट वापरासाठी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा प्रशिक्षण



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्किक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात व जवळच्या गावात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत श्री रामनाथ विद्यालय आलमला ता. औसा जि.लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत झालेल्या या सत्रात इयत्ता पाचवी ते दहावीच्या २५० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर जाधव योगिता आणि सायबर वॉरिअर बोरूळे प्राजक्ता यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख)च्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर, मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याशिवाय ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या दुव्यांपासून सावध राहणे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर तसेच डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्र्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ आंबुलगे यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी समस्त शिक्षक मंडळी व बाकी सर्व सदस्यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन करण्यात आले.

## ४७ दिवसांत ९,४२० नागरिकांशी थेट संवाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : पोलीस आपल्या दारी, सुरक्षित समाजाची

हमी या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत लातूर जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या पोलीस आपल्या सोसायटीमध्ये या अभिनव उपक्रमाला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. दि. १५ जून ते ३१ जुलै या ४७ दिवसांच्या कालावधीत लातूर जिल्ह्यातील शहरी भागातील १० पोलीस ठाण्यांनी ३१४ सोसायट्या व वस्त्यांना भेटी देत तब्बल ९,४२० नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. या संवादातून नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या, अनेक तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात आले आणि कायदा-सुव्यवस्था तसेच नागरिकांच्या सुरक्षेसंदर्भात क्षसदमात व्यापक जनजागृती करण्यात आली. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सोसायट्या, वसाहती आणि निवासी भागात जाऊन नागरिकांशी मुक्त संवाद साधला. त्यांच्या समस्या, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या आणि त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले. या उपक्रमामध्ये अहमदपूर पोलीस ठाण्याने ४६, औसा पोलीस ठाण्याने ४१, गांधी चौक व चाकूर पोलीस ठाण्यांनी प्रत्येकी ३१, शिवाजीनगरने ३०, उदगीर शहर व उदगीर ग्रामीणने प्रत्येकी २७, एमआयडीसी व विवेकानंद चौकने प्रत्येकी २६, तर निलंगा पोलीस ठाण्याने २३ भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला.

## योग्य मार्गदर्शन आणि अभ्यासात सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली!

## 'एलन'चे शाखा प्रमुख सिंग यांचा विद्यार्थ्यांना सल्ला




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याचं स्वप्न असेल, तर योग्य मार्गदर्शन आणि अभ्यासात सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय समोर ठेवून वेळेचे नियोजन केल्यास हमखास यश मिळते, असा मौलिक सल्ला एलन करिअर अकॅडमीचे शाखा प्रमुख तथा अकॅडमिक हेड ए. के. सिंग यांनी दिला.

येथील राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास 'एलन'च्या टीमने बुधवारी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी 'एलन'चे बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर पवन तिवारी, संस्थाध्यक्ष के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, एस. एम. गुरमे, आर. एन. पटने, ए. एस. खोत, एम. डी. मोटाडे, ए. बी. मुंडे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.

यावेळी सिंग म्हणाले, सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी इयत्ता ७वी किंवा ८वी पासून अभ्यासाची तयारी करावी. राष्ट्रीय पातळीवरील नीट व जेईई परीक्षेससह स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. यासाठी एलन करिअर अकॅडमीच्यावतीने विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्यांना परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी 'टॅलेन्ट टेक्स'ची सुरुवात करण्यात आली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात चार टॉपर विद्यार्थ्यांमागे 'एलन'चा एक विद्यार्थी आहे. राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही 'टॅलेन्ट टेक्स'चा लाभ घेऊन आपले स्वप्न साकार करावे, असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवणे गरजेचे आहे. परीक्षा ही एक संधी आहे. परीक्षेला धैर्याने सामोरे जा. 'टॅलेन्ट टेक्स'चा पर्याय निवडून यश संपादन करा, असे यावेळी तिवारी म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे यांनी संकुलाच्या प्रगतीचा वाढता आलेख मांडला. या संकुलाची विद्यार्थिनी संस्कृती पवार हिने नीट परीक्षेत ६९० व भूषण घरटे याने ६९२ गुण मिळविले आहेत. याबरोबरच अनेक विद्यार्थी डॉक्टर व इंजिनिअर बनले आहेत. यश मिळविण्यासाठी कोणत्या बाबींवर लक्ष केंद्रीत करावे, याबाबत 'एलन'च्यावतीने मार्गदर्शन करण्यात येते. याचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवत नामवंत कॉलेजमधून डॉक्टर व इंजिनिअर बनण्याचे ध्येय साध्य करावे, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन प्रा. वैशाली पाटील यांनी केले तर आभार राजीव मुंढे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांची मनपा प्रियदर्शनी विद्यालयास भेट; विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे केले कौतुक



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी महानगरपालिकेच्या केंद्रीय प्राथमिक विद्यालय प्रियदर्शनी येथे भेट देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील विविध उपक्रमांची पाहणी केली. विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि शिक्षकांचे कार्य पाहून त्यांनी मुख्याध्यापक संजीव सोनार व शिक्षकवृंदाचे विशेष कौतुक केले.

लेझीम पथक, औक्षण आणि सिम्फनी बँडच्या स्वागतगीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, अवर सचिव एम. जी. आरेसवड, मनपाचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त अंकुश पांढरे, विभागीय शिक्षण उपसंचालक कैलास दातखिळ, डायटचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर आदी उपस्थित होते.

देओल यांनी विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधत शाळेतील विविध उपक्रमांची माहिती घेतली. डी-मार्टच्या सहकार्याने उभारलेल्या संगणक प्रयोगशाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांचे त्यांनी कौतुक केले. तसेच सीबीएसई व मराठी माध्यमाच्या वर्गांना भेट देऊन क्रीडा आणि संगीत क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी देसले यांनी केले, तर आभार प्रशासन अधिकारी तथा मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## रेंज रोव्हर लक्झ्युरीचे भारतातील अप्रतिम सादरीकरण

**मुंबई :** रेंज रोव्हरच्या लक्झ्युरी आणि अनोख्या वैशिष्ट्यांचे अप्रतिम प्रतिक असलेली रेंज रोव्हर एसव्ही अल्ट्रा ही कार रेंज रोव्हरतर्फे सादर करण्यात आली आहे. उत्कृष्ट फिनिश आणि जगातील अभूतपूर्व अशा ऑडिओ तंत्रज्ञानासह सादर झालेली एसव्ही अल्ट्रा ही रेंज रोव्हरची आजवरची सर्वाधिक लक्झ्युरी आणि तांत्रिकदृष्ट्या आधुनिक अशी कार आहे. रेंज रोव्हर एसव्ही अल्ट्रामधील अप्रतिम ऑडिओ तंत्रज्ञानात आता क्रांतीकारी एसव्ही इलेक्ट्रोस्टॅटिक साऊंड या नव्या तंत्रज्ञानाची भर पडली आहे. यामुळे गाडीची केबिन जणू एखाद्या कॉन्सर्ट हॉलसारखी भासते. शिवाय, यात बॉडी अँण्ड सोल सीट्स आणि सेन्सरी हेप्टिक फ्लोअरही आहे. एसव्ही इलेक्ट्रोस्टॅटिक साऊंड हा जगभरात एखाद्या वाहनात इलेक्ट्रोस्टॅटिक ऑडिओ तंत्रज्ञान वापरण्याचा पहिलाच प्रयोग आहे.

## एसुस कडून स्वातंत्र्यदिन 2026 निमित्त विशेष लॅपटॉप ऑफर्स

**पुणे :** तैवानमधील जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी एसुस भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा उत्सव विविध उत्पादनांवरील आकर्षक ऑफर्ससह साजरा करत आहे. स्वातंत्र्यदिन विशेष सेल दरम्यान ग्राहकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज एसुस लॅपटॉप्ससह आपल्या डिजिटल अनुभवाला नव्या उंचीवर नेण्याची उत्तम संधी मिळणार आहे. उच्च कार्यक्षमतेचे गेमिंग लॅपटॉप्स ते आकर्षक आणि उत्पादकता वाढविणारे प्रीमियम लॅपटॉप्सपर्यंत, एसुस आपल्या लोकप्रिय आरओजी, टीयूएफ, व्हिवोबुक आणि झेनबुक सिरीजवर आकर्षक सवलती आणि विशेष ऑफर्स देत आहे. मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध या विशेष ऑफरमध्ये ग्राहकांना एसुसच्या सर्वोत्तम कार्यक्षमतेच्या लॅपटॉप्सवर तब्बल 53% पर्यंत बचत करण्याची संधी मिळणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्कृष्ट कार्यक्षमता आणि नाविन्यपूर्ण वैशिष्ट्यांनी सज्ज लॅपटॉपमध्ये गुंतवणूक करण्यासाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

## ग्लोबल लो व्होल्टेज मोटर्स पोर्टफोलिओचा विस्तार

**मुंबई:** सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेड (सीजी) या जागतिक अभियांत्रिकी कंपनी आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने नेक्सोरा या नेक्स्ट जनरेशन आयई३ आणि आयई४ जनरल पर्पज मोटर्सच्या नवीन सिरीजच्या लाँचची घोषणा केली आहे. यामुळे कंपनीचा ग्लोबल लो व्होल्टेज (एलव्ही) मोटर्सचा पोर्टफोलिओ अधिक मजबूत झाला आहे. स्किरल केज इंडक्शन मोटर्सची ही नवीन श्रेणी सीजीच्या सध्याच्या आयई३ आणि आयई४ पोर्टफोलिओमध्ये भर घालणारी आहे, तसेच जगभरातील विविध औद्योगिक अनुप्रयोगांमध्ये उत्तम ऊर्जा कार्यक्षमता, कार्यक्षमतेची विश्वासार्हता आणि शाश्वत कामगिरी देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

## वेळेपूर्वी डिलिव्हरीची घोषणा

**मुंबई:-** सॅमसंगने आज भारतातील डिवाईसेस प्री-बुक केलेल्या ग्राहकांसाठी बहुप्रतिक्षित नवीन फोल्डेबल स्मार्टफोन्स गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, गॅलेक्सी झेड फोल्ड८ आणि गॅलेक्सी झेड फ्लिप८ यांच्या वेळेपूर्वी डिलिव्हरी सुरू करण्याची घोषणा केली. भारतात २२ जुलै रोजी झालेल्या लाँचच्या अवघ्या ७२ तासांच्या आत २,७१,००० हून अधिक प्री-ऑर्डर्स मिळवत गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, गॅलेक्सी झेड फोल्ड८ आणि गॅलेक्सी झेड फ्लिप८ ला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. याउलट, मागील पिढीच्या गॅलेक्सी झेड फोल्ड७ आणि गॅलेक्सी झेड फ्लिप७ साठी समान संख्येने प्री-ऑर्डर्स मिळवण्यासाठी १५ दिवस लागले होते, ज्यामधून फोल्डेबल तंत्रज्ञानाचा मुख्य प्रवाहात सातत्याने होत असलेला स्वीकार दिसून येतो.

# वाराणसीहून संत रविदास महाराज कलश यात्रा आज छत्रपती संभाजीनगरात; 'समरसता संकल्प अभियानाला' प्रारंभ

### 72 संघटनात्मक जिल्ह्यांत रवाना होणार पवित्र कलश; दुष्यंत गौतम, लालसिंग आर्य, रविंद्र चव्हाण यांची उपस्थिती

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर:** संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित 'समरसता संकल्प अभियान' अंतर्गत वाराणसीहून निघालेली संत रविदास महाराजांची कलश यात्रा गुरुवारी (७ ऑगस्ट) छत्रपती संभाजीनगरात दाखल होत आहे. मुकुंदवाडी येथील संत रविदास महाराज मंदिरातून सकाळी १० वाजता कलश यात्रेला प्रारंभ होणार असून कासलीवाल मैदान येथे यात्रेचा समारोप होईल. शहरातील विविध ठिकाणी भाजप आणि सामाजिक संस्थांकडून यात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे.



कासलीवाल मैदान येथे संतांच्या हस्ते पवित्र कलशाचे पूजन करण्यात येईल. त्यानंतर भाजपच्या संघटनात्मक रचनेनुसार राज्यातील ७२ जिल्ह्यांसाठी हे कलश रवाना करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाला भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा खासदार दुष्यंत गौतम, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष लालसिंग आर्य, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या अभियानाचा उद्देश संत रविदास महाराजांनी मांडलेला सामाजिक समरसता, समानता आणि मानवतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे हा असल्याचे भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. संत रविदास महाराजांनी जन्म, जात किंवा वंश याऐवजी कर्म, चारित्र्य आणि भक्ती यांनाच माणसाच्या मूल्याचा खरा आधार मानला. त्यांनी लोकभाषेतून अध्यात्म आणि सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा प्रभाव भक्ती चळवळीतील विविध परंपरांवर पडल्याचे मानले जाते. तसेच श्री गुरु नानक देवांनी त्यांच्या वाणीचे संकलन केले असून त्यातील अनेक पदे पुढे श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट करण्यात आली, अशी ऐतिहासिक माहितीही यावेळी देण्यात आली.

समाजात जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न हाणून पाडून सामाजिक ऐक्य अधिक मजबूत करण्यासाठी 'समरसता संकल्प अभियान' महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या कलश यात्रेचे संयोजक म्हणून आमदार माधवी नाईक, तर सहसंयोजक म्हणून आमदार नारायण कुचे, विश्वजीत गायकवाड, राहुल तुपसांडे, राम सातपुते आदी कार्यरत आहेत.

या पत्रकार परिषदेला कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, आमदार नारायण कुचे, आमदार अनुराधाताई चव्हाण, महापौर समीर राजूरकर भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, माजी आमदार संजय केणेकर, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## मुख्याध्यापक बाळासाहेब रंगनाथ कासार यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न

**शिर्डी :** साईबाबांच्या पुण्यनगरीत दिव्यांगांसाठी कार्यरत असलेल्या श्री साई अपंग विकास महिला मंडळ संचलित,श्री साई-श्रद्धा ग्रामीण मुक-बधिर विद्यालयातील सन १९९७ पासून कार्यरत असलेले शिक्षक तथा मुख्याध्यापक बाळासाहेब रंगनाथ कासार सर यांचा सेवापुर्ती व अभिष्टचिंतन सोहळा श शिर्डीत संपन्न झाला.



संगमनेर तालुक्यातील काकडवाडी सारख्या ग्रामीण भागातील सुसंस्कृत कुटुंबातील शांत,संयमी कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्व श्री बाळासाहेब रंगनाथ कासार सर यांनी दिव्यांगांच्या सेवेसाठी मुक-बधिर दिव्यांग शिक्षकाचे प्रशिक्षण तथा पदवी संपादन करून श्री साई अपंग विकास महिला मंडळ संचलित श्री साई-श्रद्धा ग्रामीण मुक-बधिर विद्यालयात शिक्षक म्हणून सेवा स्वीकारली. विद्यालयातील मुक-बधिर विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करत असतानाच दिव्यांगांच्या सामाजिक,शैक्षणिक पुनर्वसनासाठी महत्त्वाचे योगदान दिले.आपल्या कर्तव्य कालावधी पेक्षा अतिरिक्त वेळ देऊन दिव्यांगांच्या सेवेसाठी 29 वर्ष अविरत कार्य केले. विनाअनुदानित कालावधीत अनेक वर्ष त्यांनी विनावेतन सेवा दिली.संस्था पदाधिकारी संचालक व संस्थापक सर्वांना विश्वासात घेऊन त्यांचे मार्गदर्शनातून त्यांनी निवासी मुक-बधिरांच्या शैक्षणिक सामाजिक आर्थिक पुनर्रचनासाठी अविरत कार्य केले.वेळेला कुटुंबाकडे दुर्लक्ष करून त्यांनी शाळा विकासाकडे लक्ष केंद्रित केले.

आज त्यांच्या या सेवापूर्ती सोहळ्यात सर्व कर्णबधिर विद्यार्थी, सहकारी कर्मचारी वृंद त्यांना निरोप देताना भावुक झाल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आले.त्यांचा शांत स्वभाव विद्यार्थी कर्मचारी यांसह संस्थाप्रमुखांनाही भावला. "यापुढेही आपल्या मदतीची व मार्गदर्शनाची विद्यालयास गरज असल्याचे"प्रतिपादन संस्थापक मा.श्री माधवराव चौधरी सर केले. सत्कारमूर्ती बाळासाहेब कासार सर संस्थेप्रति कृतज्ञता व्यक्त करत असताना अत्यंत भावुक झाले. यावेळी सर्वांचा निरोप घेताना त्यांना अश्रू अनावर झाले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. ज्ञानेश्वर (आबा)गोंदकर पाटील होते. शिर्डी नगरपरिषदेचे मा.नगराध्यक्ष शिवाजीराव गोंदकर,शिवसेना जिल्हाध्यक्ष मा.कमलाकरजी कोते, श्री गणेश सहकारी साखर कारखान्याचे मा.व्हा.चेअरमन प्रतापराव जगताप,बाजार समितीचे संचालक ज्ञानदेव चौधरी, राजेंद्र चौधरी,डॉ.मुकुंदराव चौधरी ह.भ.प.भाऊसाहेब महाराज झुरुळे, श्री गजानन घुले,श्री दत्तात्रय वहाडणे,श्री आण्णासाहेब देठे,दादासाहेब चौधरी बापुमामा दाभाडे,महिला मंडळाच्या सरचिटणीस सौ.वैशालीताई चौधरी विरेश चौधरी आदी मान्यवर तसेच दिव्यांग मुक-बधिर विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री साई -श्रद्धा ग्रामीण मुक-बधिर विद्यालयचे- वस्तीगृहाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद कासार परिवार, काकडवाडी ग्रामस्थ, मित्र मंडळ व आप्तेष्ट या सर्वांचे सहकार्य लाभले

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे नशा मुक्त भारत महाअभियान चा शुभारंभ संपन्न

**सोयगाव,दि.६ ऑगस्ट :** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय तसेच गृह मंत्रालयाच्या नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो (NCB) यांच्या सहकार्याने देशभर नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येत असून 3 ते 20 ऑगस्ट 2026 पर्यंत जनजागृती करण्यात येत आहे. या अभियानाचे स्वागत करून दहा कोटी नशा मुक्त भारत महाअभियानाला प्रतिसाद देत सोयगाव येथील समाज प्रबोधनकार तथा महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार 2016 - 2017 सन्मानित विष्णू विनायकराव मापारी सोयगावकर यांनी दि. 3 ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



प्रथमतः सरस्वती मातेचे पूजन केंद्रप्रमुख फिरोज तडवी,अध्यक्ष रवींद्र काळे,मुख्याध्यापक किरण पाटील यांचे हस्ते करण्यात येऊन या महा अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.प्रमुख अतिथी म्हणून कृषी भूषण अरुण सोहनी, आरोग्य दूत दिगंबर वाघ,राजेंद्र पाटील,अध्यक्ष रविंद्र काळे, शालेय समिती अध्यक्ष व सर्व सदस्य उपस्थित होते.यावेळी समाज प्रबोधनकार विष्णू मापारी सोयगावकर अभियानाचा उद्देश सांगताना म्हणाले की भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय तसेच गृह मंत्रालयाच्या नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो एनसीबी यांच्या सहकार्याने देशभर नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येत असून समाजात व्यसनमुक्ती बाबत व्यापक जनजागृती निर्माण करणे,युवकांना सकारात्मक व मूल्याधिष्ठित जीवनशैलीकडे प्रेरित करणे,आणि नशा मुक्त भारत सशक्त भारत हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.तसेच त्यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगुन नशामुक्तीचे महत्व सांगितले.यावेळी रविंद्र काळे,केंद्रप्रमुख फिरोज तडवी,मुख्याध्यापक किरण कुमार पाटील यांनी नशा मुक्ती बद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगला बोरसे यांनी केले.यावेळी सामूहिक नशा मुक्त भारत प्रतिज्ञा घेण्यात आली.कार्यक्रमास विद्यार्थी,गावकरी,सर्व शिक्षक,शिक्षिका,मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.

## एमएमसीकडून सीसीएमपी डॉक्टरांच्या स्वतंत्र नोंदणीला प्रारंभ; तीन दशकांच्या संघर्षाला यश



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी)ने अनुसूची–२८ अंतर्गत बीएचएमएस–सीसीएमपी डॉक्टरांच्या स्वतंत्र नोंदणी (सेपरेट रजिस्टर) प्रक्रियेला अधिकृत प्रारंभ केला असून पहिले डिजिटल नोंदणी प्रमाणपत्र जारी केले आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो इंटिग्रेटेड (बीएचएमएस–सीसीएमपी) डॉक्टरांच्या तीन दशकांहून अधिक काळ सुरू असलेल्या संघर्षाला अखेर यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण विभाग, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल तसेच निर्णय प्रक्रियेत योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानण्यात आले. तसेच हिमपॅम, नीमा, सीसीएमपी डॉक्टर्स असोसिएशन, आयुष क्षेत्रातील विविध संघटना, कृती समित्या, कायदेतज्ज्ञ, ज्येष्ठ मार्गदर्शक आणि या लढ्यात सहभागी झालेल्या डॉक्टरांचेही अभिनंदन करण्यात आले.

पहिले डिजिटल नोंदणी प्रमाणपत्र 'पवार' आडनावाच्या डॉक्टरांना मिळणे हा उल्लेखनीय योगायोग असल्याचे नमूद करत सीसीएमपी अभ्यासक्रमाचे शिल्पकार स्व. अजितदादा पवार यांना अभिवादन करण्यात आले. तसेच एमसीएचचे प्रशासक डॉ. बाहुबली शहा, डॉ. परेश नवलकर, विविध ज्येष्ठ नेते, कायदेशीर सल्लागार, कार्यकर्ते आणि प्रसारमाध्यमांचेही योगदान अधोरेखित करण्यात आले. हिमपॅम मराठवाड्याचे चेअरमन, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीचे उपाध्यक्ष तथा हिमपॅम महाराष्ट्रचे संस्थापक सदस्य डॉ. प्रकाश झांबड यांनी हा विजय कोणाच्याही पराभवाचा नसून कायदा, लोकशाही, न्याय, संयम, एकजूट आणि रुग्णहिताचा विजय असल्याचे सांगितले.

## पीएमश्री लाडसावंगी शाळेच्या शिक्षकांचा अवयवदानाचा संकल्प; विद्यार्थ्यांच्या पथनाट्यातून जनजागृती

### विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये अवयवदानाबाबत जागृती




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल, लाडसावंगी येथे अवयवदान जनजागृतीचा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक गोरखनाथ नजन, शिक्षक नामदेव पवार आणि विज्ञान शिक्षिका सारिका जैन यांनी मरणोत्तर अवयवदानाचा संकल्प करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श समाजापुढे ठेवला.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल ढोके, आदर्श शिक्षिका छाया वाघ, अलका सोनवणे, प्रकाश मोरे, आनंदराव माघाडे, शिवराज मोहिते, साधना पाटील, संगीता लेमटे, धुरपती कदम, सुवर्णा टाक, राजश्री पंडित, वंदना केदारे, उत्तम कोळेकर, रघुनाथ काकडे, सचिन धस, अमोल सोनटक्के, संगीता कौलकर, प्रज्ञा जाधव, दिनेश कुलकर्णी, राजू बावस्कर, अनिल वाणी, विनोद चव्हाण आदी उपस्थित होते.

या निमित्ताने इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षिका सारिका जैन यांच्या मार्गदर्शनाखाली अवयवदान आणि देहदान या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर केले.

## मंठा नगर पंचायत, मंठा

ता. मंठा जि. जालना.४३१५०४ Email id npmantha@gmail.com दुरध्वनी क्र. : (02484)271122
जाहीर निविदा सुचना जा.क्रन.पं.मं. निविदा/4/2026 दिनांक 112026

### जाहीर निविदा सुचना

नगरपंचायत मंठा यांच्या वतीने नोंदणीकृत गुत्तेदार संस्था यांच्याकडुन द्विलिफाफा पध्दतीने दिनांक 07/08/2026 ते 14/08/2026 या कालावधीत सायं 17.00 वाजेपर्यंत खालीलप्रमाणे नमूद काम करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर माहिती नगरपंचायत मंठा कार्यालयात कार्यालयीन वेळेत उक्त कालावधीत सायं. 17.00 वाजेपर्यंत पहावयास व विक्रिसाठी ठेवण्यात आले आहेत. प्राप्त निविदा दिनांक 14/08/2026 रोजी सायं. 17.15 वाजल्यानंतर उघडण्यात येईल.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाचा कालावधी | बायणा रक्कम फि | कोरी निविदा फी |
|---|---|---|---|---|
| 1 | न.पं. निधी अंतर्गत मंठा शहरातील मानसुन कालावधी नाले सफाई कामगार 07 तसेच घंटा गाडी चालक 03 हेल्पर 02 पुरवठा करण्यासाठी सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठी स्वच्छता विभागत कुशल अकुशल सहा महिण्या करिता मनुष्यबळ पुरवठा करणे बाबत. | 6 महिने | 2000/- | 500/- |

1. सर्वपात्र इच्छुक कंत्राटदार/संस्था यांनी नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.
2. दरपत्रक दोन लिफाफ्यात सादर करण्यात यावीत. पहिल्या लिफाफ्यात 1% इसार रक्कम मुख्याधिकारी नगरपंचायत मंठा यानावाने राष्ट्रीयकृत बँकेचा डीडी अथवा रोखीने रक्कम जमा केल्याची पावती टाकण्यात यावी तसेच यामध्ये कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत टाकण्यात यावी व लिफाफा क्र.02 मध्ये सर्वप्रकारच्या करा सह दर दरपत्रकात टाकण्यात यावे.
3. कंत्राटदार ज्या कामासाठी दरपत्रक देणार आहे, त्या कामाचा स्पष्ट उल्लेख दोन्ही बंद लिफाफ्यावर करण्यात यावा व त्याखाली कंत्राटदाराने स्वतःचे/एजन्सीचे नाव लिहिणे बंधनकारक आहे.
4. कंत्राटदारस वी-1 निविदेच्या सर्वअ टी व शर्ती लागू राहतील.
5. निविदेतील अटी व शर्तीत कोणताही बदल व तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्यात अथवा नाकारण्याचा अधिकर मुख्याधिकारी नगरपंचायत मंठा यांना असेल.
6. प्रस्तावित कामे हे नगरपंचायत फंडातुन करावयाचे असल्याने निधी उपलब्धेनुसार बिल देण्यात येईल.

स्वाक्षरीत /-
मुख्याधिकारी
नगरपंचायत, मंठा

# तालुका क्रीडा संकुलाच्या कामाचे भूमिपूजन आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.६ ऑगस्ट :** सोयगाव व परिसरातील युवक-युवतींना आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने ₹२ कोटी ९३ लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या आधुनिक तालुका क्रीडा संकुलाच्या कामाचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.



ग्रामीण भागातील खेळाडूंनाही शहरांप्रमाणे दर्जेदार क्रीडा सुविधा मिळाव्यात, त्यांना सरावासाठी इतर ठिकाणी जावे लागू नये आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडावेत,या दूरदृष्टीतून आमदार अब्दुल सत्तार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी निधी मंजूर करून घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच सोयगाव तालुक्याला आधुनिक क्रीडा संकुलाची ही मोठी भेट मिळाली आहे.

या कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे, जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर,कृउबा समितीचे संचालक केशवराव पा.तायडे,दारासिंग चव्हाण, धरमसिंग चव्हाण,शिवसेना शहर प्रमुख संतोष बोडखे, गटनेते अक्षय काळे,स्वप्निल पाटील,राजू दुतोंडे,कदीर शहा, हर्षल काळे,गजानन कुडके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते,खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रकल्पाअंतर्गत ४०० मीटर धावपट्टी व बाह्य गटार,मल्टी गेम हॉलचे रंगकाम,फ्लोअरिंग,पाणीपुरवठा व स्वच्छता व्यवस्था,अत्याधुनिक साऊंड सिस्टीम,छताच्या दोन्ही बाजूंना ड्रेनेज व्यवस्था,व्हॉलीबॉल व खो-खो मैदानांची उभारणी,मुख्य प्रवेशद्वार,संरक्षक कंपाऊंड भिंत तसेच इनडोअर खो-खो हॉलचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यामुळे सोयगाव तालुक्यात प्रथमच खेळाडूंना आधुनिक आणि सर्व सुविधांनी युक्त क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे.यावेळी बोलताना आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले की, "ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांना योग्य सुविधा आणि संधी मिळाल्यास ते राज्य व देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात.

## जाहीर नोटीस

मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (व्हि. डी. पाटील साहेब, कन्नड यांच्या कोर्टात

दिवाणी अर्ज क्र- ३०८/२०२६ पु.तारीख - ०७.०९.२०२६

अर्जदार :- १. रंजना भ्र. रामदास बोराडे, रा. गव्हाली, ता. कन्नड जि. औरंगाबाद २. तेंजस पिता रामदास बोराडे, वय २५ वर्षे, धंदा मजुरी, रा. गव्हाली ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. निकीता भ्र.अनिल त्रिभुवन, वय २२ वर्षे, धंदा घरकाम, रा. सटाणा ता. वैजापुर जि. औरंगाबाद ४. सविता भ्र. मनोज त्रिभुवन, वय २० वर्षे, धंदा घरकाम, रा. सटाणा, ता. वैजापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

अर्ज :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी अॅड. डी. के. साळवे कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत रामदास पिता कचरु बोराडे हे अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील असुन अर्जदार क्रं. १ ही मयत रामदास पिता कचरु बोराडे यांची पत्नी आहे. मयत रामदास पिता कचरु बोराडे हे दि.०६.०९.२०१४ रोजी मौजे गव्हाली ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहे. मयत रामदास पिता कचरु बोराडे यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. रामदास पिता कचरु बोराडे हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय, तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, महसुल कार्यालय, ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जा मध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्याम अर्जदाराचा अर्ज मंजुर करून अर्जदार नं. १ ने ४ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन दिनांक/२०२६

आदेशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

---

मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर, सोयगाव यांचे नि. न्यायालय जि. औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६९/२०२६.

१. ऊषा नितीन नरवडे, वय. ४८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. बियाणी मिलीट्री स्कुलजवळ, साईबाबा मंदीर, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव. २. कल्पना भगिनाथ लोखंडे, वय. ४१ वर्षे, धंदा. घरकाम, रा. गिता कॉलनी, पडेगांव, ता. जि. छत्रपती संभाजीनगर. ३. भगवान उमाजी साबळे, वय. ४५ वर्षे, धंदा. मजुरी, रा. रामजीनगर, आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ...अर्जदार

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी **अॅड. वाय. आर. जावळे,** सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. **मयत शांताबाई उमाजी साबळे** या दि. १५/०४/२०२३ रोजी मौजे. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे शांताबाई उमाजी साबळे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.

**पुढील तारीख :- १५/०९/२०२६.**

आज दि. ०६/०८/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

सही/- (शिक्का) आदेशावरून सही/-
विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

---

वसुली व विक्री अधिकारी
व्दारा दि शेगांव श्री अग्रसेन सहकारी पत संस्था म. शेगांव

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, कर्जदार-प्रल्हाद ट्रेडींग कंपणी प्रो.प्रा. श्री प्रल्हाद रामभाऊ बासटवार रा. हिंगोली गहाणदार व जमानतदार१) सौ मंजुषा प्रल्हाद बासटवार जमानतदार २) सचिन सुर्यकांत गुंडेवार ३) संतोष नारायण प्रतापवार ४) ओमप्रकाश बन्शीलाल खंडेलवाल सर्व रा. हिंगोली घांनी दि शेगांव श्री अग्रसेन सहकारी पत संस्था म. शेगांव चे शास्वा हिंगोली कडुन घेतलेले कर्ज थकविले. त्यामुळे संस्थेने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये डिक्री प्राप्त केली आहे. त्यांचे कडे रू. २३,४८,७५० दि.२०/१२/२०२३ पासुन पुढे १६ टक्के प्रमाणे होणारे व्याज व खर्च घेणे बाकी आहे. कलम १५६ चे प्राप्त अहि-स्कारान्वये नियम १०७ व त्या मधील उपनियमान्वचे सत्कीने थकबाकी कर्ज वसूली ची कारवाई सुरू आहे. सदर कर्जा पोटी गहाणात दिलेली पुढील वर्णनाची स्थावर मालमत्ता मौजे हिंगोली नगर परीषद हद्दीतील सिटी सर्वे क. १४७८ वार्ड. नं १३ न्यु. घर क्र.१३/६२ क्षेत्रफळ १२०० चौ. फुट. म्हणजेच १११.५३ चौ. मी. सर्व प्रकारचे वही वाटीचे हक्कासह जप्त केली आहे.

तरी सदर स्थावर मालमत्तेचे बाबतीत कोणीही स्वरेदी विक्रीचा व्यवहार करू नये तसेच था मालमत्तेचे बाबत कोणत्याही प्रकारे हस्तांतरणा व्दारे स्वाधिन करू नये अथवा त्यावर कोणताही भार ठेवण्यात किंवा निर्माण करू नये. तसे केल्यास फौजदारी गुन्हा समजुन पुढील कारवाई करण्यात चेईल व या बाबत केलेला स्वरेदी विक्रीचा व्यवहार व हस्तांतरण रदद् व निरर्थक ठरेल.

गांव - हिंगोली
दि. ०१/०७/२०२६

सही
वसुली व विक्री अधिकारी
व्दारा दि शेगांव श्री अग्रसेन
सह. पत संस्था म. शेगांव

## अग्रलेख

# ...हे देखील 'इन्फ्रास्ट्रक्चर'च !

नीती आयोगाच्या शालेय शिक्षण व्यवस्थेवरील ताज्या अहवालाने शिक्षण क्षेत्राचे जे भयावह वास्तव मांडले आहे, ते अत्यंत चिंताजनक म्हणावे असे आहे. एकीकडे आपण आत्मनिर्भर आणि विकसित भारताचे स्वप्न बघत आहोत. विश्वगुरू होण्याची आकांक्षा आणि जगातील मातब्बर अर्थव्यवस्था बनण्यासाठी प्रयत्न करतो आहोत. दुसरीकडे, देशातील हजारो शाळांना कुलूप ठोकले जात आहे. लाखो मुलांचे शिक्षण माध्यमिक स्तरावर पोहोचण्याआधीच ठप्प होते आहे. कहर म्हणजे, ज्या शाळा सुरू आहेत, तिथेही शिक्षकांचा आणि सोयीसुविधांचा अभाव आहे. नीती आयोगाच्या अहवालानुसार, २०१७-१८ ते २०२२-२३ या अवघ्या पाच वर्षांत देशभरातील तब्बल ९२ हजार शाळा बंद पडल्या आहेत. लोकसंख्या वाढत असताना शाळांची संख्या १५.५८ लाखांवरून १४.६६ लाखांवर येणे धक्कादायक आहे. आहे त्या शाळांमध्ये सोयी नाहीत आणि असलेल्या शाळा बंद पडत आहेत, हे अत्यंत धोकादायक लक्षण मानले पाहिजे. देशातील १ लाखाहून अधिक शाळा आजही 'एका शिक्षकावर' चालत आहेत. तर ७ हजार ९९३ शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी एकही विद्यार्थी उरलेला नाही !

शाळा बंद पडण्यामागे सरकारच्या वतीने 'पटसंख्येची घट', 'शाळांचे विलीनीकरण' आणि 'एकात्मिक शाळा उभारणे' यासारखे धोरणात्मक व तांत्रिक युक्तिवाद केले गेले असले, तरी त्यामागील खरे कारण ग्रामीण भागात शिक्षकांचा अभाव, पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था आणि प्रशासकीय व्यवस्थेचे ढळढळीत अपयश हेच आहे. शाळेत पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वाचनालय, संगणक प्रयोगशाळा आणि विषयतज्ज्ञ शिक्षक नसतील तर पालकांनी आपल्या मुलांना अशा शाळांमध्ये का पाठवावे, हा मुद्दा प्रशासनाच्या लक्षात येत नाही. बिहारच्या कैमूर जिल्ह्यातील एका माध्यमिक शाळेत पिण्याचे पाणी आणि पंखे नसल्याने विद्यार्थ्यांनीच आंदोलन केले आणि शेवटी उपविभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. महाराष्ट्रातील वेल्हे, धारूर आदी गावांमध्येही असेच आंदोलन झाले. आपल्या भविष्यासाठी आता विद्यार्थीच आंदोलन करीत आहेत, हे कुणालाच खटकत कसे नाही? एकाच शिक्षकाने पहिली ते चौथीपर्यंतच्या साऱ्या विद्यार्थ्यांना एकाच वर्गात बसवून शिकवणे, हे शिक्षण व्यवस्थेचे अपयश नव्हे तर काय? सरकारी शाळांमध्ये गुणवत्तेचा अभाव असतो म्हणून अपरिहार्यता म्हणून विद्यार्थी खाजगी शाळांत जातात. जे जाऊ शकत नाहीत, ते शिक्षणापासून दुरावतात. परिणामी पटसंख्या घटते आणि शेवटी त्या शाळा कायमच्या बंद पडतात. विद्यार्थी गळतीची आकडेवारी पाहिली तर परिस्थिती अधिकच भयाण दिसते. प्राथमिक स्तरावर प्रवेश घेण्याचे प्रमाण पुरेसे वाटत असले तरी उच्च माध्यमिक शाळेत पोहोचेपर्यंत ते फक्त निम्मे उरते. प्राथमिक शिक्षणात पाऊल ठेवणाऱ्या दर दहा विद्यार्थ्यांपैकी चार विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचण्यापूर्वीच शिक्षण सोडून देतात. प्राथमिक ते उच्च प्राथमिक ९२.२ टक्के, उच्च प्राथमिक ते माध्यमिक ८६.६ टक्के आणि माध्यमिक ते उच्च माध्यमिक ७५.१० टक्के अशी प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांची मोठी गळती होत आहे. यामागे आर्थिक आणि सामाजिक घटक कारणीभूत आहेत. माध्यमिक शिक्षणाचा खर्च प्राथमिक शिक्षणापेक्षा ३ ते ५ पट जास्त आहे. शिक्षण हक्क कायदा केवळ १४ वर्षांपर्यंत म्हणजे ८ वीपर्यंतच मोफत शिक्षणाची हमी देतो. त्यामुळे माध्यमिक स्तरावर येताच शुल्क, प्रवास आणि परीक्षेच्या खर्चाचा ताण गरीब विद्यार्थी सहन करू शकत नाहीत. परिणामी, शाळेत जाण्याऐवजी ३९ टक्के मुले रोजगारात ढकलली जातात, २५ टक्के मुली कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये अडकतात. स्वच्छतागृहांच्या अभावामुळे सुद्धा मुली शिक्षण सोडून देतात. परवाच दृक-श्राव्य माध्यमावर एक बातमी झळकली, ज्यात स्वच्छतागृह वापरण्यासाठी विद्यार्थिनींची लांबलचक रांग लागली होती! खरे तर, देशातील भीषण गरिबी, स्त्री व बालकांवरील वाढते अत्याचार, प्रशासनातील प्रचंड भ्रष्टाचार आणि समाजात दिवसेंदिवस क्षीण होत चाललेली नागरी कर्तव्याची जाणीव याचा मागोवा घेत गेलो तर या सर्व सामाजिक व्याधींच्या केंद्रस्थानी शैक्षणिक संधींचा आणि दर्जेदार शिक्षणाचा अभाव हेच कारण दिसते. एखाद्या विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण मिळत नाही, तेव्हा त्याच्यातील विचार करण्याची, न्याय-अन्याय पारखण्याची आणि कौशल्य आत्मसात करण्याची क्षमता खुंटते. शिक्षणाअभावी रोजगाराच्या चांगल्या संधी हिरावल्या जातात आणि ती व्यक्ती व सोबतच त्याचे कुटुंब गरिबीच्या दुष्टचक्रात फसून राहते. दारिद्र्य आणि बेरोजगारीतून निर्माण होणारी हतबलता तरुण पिढीला गुन्हेगारी, व्यसनाधीनता आणि भ्रष्टाचाराकडे नेते. ज्या समाजात शाळा बंद पडतात, तिथे तुरुंगांची संख्या वाढवावी लागते, हा मानवी इतिहासातला नियम आहे. जेव्हा शिक्षण केवळ स्पर्धा, रँकिंग आणि कागदी पदव्यांमध्ये गुंडाळले जाते, जेव्हा ते विचारांची प्रगल्भता देत नाही, तेव्हा सुजाण नागरिक निर्माण होण्याची प्रक्रियाच बंद पडते. रस्त्यांवर कचरा फेकून देणे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणे, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणे, चिडीमारी करणे, व्यसनाधीन होणे आणि भ्रष्टाचाराचे उघड समर्थन करणे ही सगळी नागरी मूल्यांच्या आणि सुसंस्कृततेच्या अभावाची लक्षणे आहेत. नेल्सन मंडेला यांनी म्हटल्याप्रमाणे, शिक्षण हे असे शक्तिशाली शस्त्र आहे, ज्याचा वापर तुम्ही जग बदलण्यासाठी करू शकता. शिक्षणाचे हेच शस्त्र आपण गरीब वर्गाच्या हातात देऊ शकत नाही, तेव्हा त्यांना कायम शोषणाच्या अंधारात ढकलण्याचे पाप व्यवस्था करीत असते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीही स्पष्ट इशारा दिला होता की, जोपर्यंत देशातील शेवटच्या बालकाला उत्तम शिक्षण मिळत नाही, तोपर्यंत लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त होत नाही. स्वतंत्र भारताची शैक्षणिक कामगिरी ९२ हजार शाळांना कुलूप ठोकण्याच्या वर्तमानाशी पडताळून बघितली पाहिजे.

शिक्षणाचा दर्जा घसरण्यामागे आणि शाळा बंद पडण्यामागे या क्षेत्रावर होणारा तुटपुंजा खर्चही कारणीभूत आहे. आपल्या देशात सध्या शिक्षणावर केवळ २.९ ते ३.१ टक्के खर्च केला जातो. १९६६ च्या 'कोठारी आयोगाने' देशाच्या जीडीपीच्या किमान ६ टक्के खर्च शिक्षणावर करण्याची शिफारस केली होती. अगदी अलिकडच्या 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' मध्येही ६ टक्के खर्चाचा पुनरुच्चार झाला आहे. पण, गेल्या सहा दशकांत एकाही सरकारला हा टप्पा गाठता आलेला नाही. जगातील प्रगत आणि विकसित राष्ट्रांत शिक्षणावर मोठा खर्च केला जातो. नॉर्वे शिक्षणावर ८ टक्के, स्वीडन व फिनलंड ७.२ टक्के, अमेरिका ६ ते ६.२ टक्के खर्च करतात आणि म्हणून तेथे गरिबीचे प्रमाण कमी आहे. मानवी विकास निर्देशांकही जास्त आहे. भारत नावाचा विकसनशील देश द्रुतगती मार्ग, उड्डाणपूल, विमानतळे आणि भव्य इमारती यासारख्या भौतिक पायाभूत सुविधांवर लाखो कोटी रुपये खर्च करीत आहोत, ते केलेही पाहिजे. पण केवळ सिमेंट-काँक्रीटचे रस्ते आणि पूल बांधून राष्ट्र महान होत नसते. उत्तम, सुजाण, ज्ञानी आणि नैतिक मूल्ये जपणारे नागरिक हेही या देशाला आवश्यक असलेले 'इन्फास्ट्रक्चर'च आहेत, हे समजून घेतले पाहिजे. गरिबी समूळ नष्ट करायची असेल, गुन्हेगारीला वेसण घालायची असेल, भ्रष्टाचार कमी करायचा असेल आणि देशाला प्रगल्भ व सुसंस्कृत राष्ट्र म्हणून उभे करायचे असेल, तर शिक्षणावरील खर्चाला 'अनुत्पादक खर्च' न मानता, ती राष्ट्राच्या भविष्यासाठी पायाभूत सुविधांतील गुंतवणूक मानली पाहिजे. शिक्षणावर खर्च करतानाच व्यवस्थेचा हात आखडता असतो. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार हा तर वेगळाच विषय. या साऱ्यांवर आपण काहीच करणार नसू तर तुरुंगांची सर्वाधिक संख्या असलेला देश म्हणून लवकरच भारताचे नाव गाजेल, यात शंका नाही. ■

## दखल

**विवेक गिरिधारी**

# पूर्वांचलाशी एकरूप झालेले वर्णेकर दाम्पत्य

**मूळ नागपूरचे अशोकराव व अलकाताई वर्णेकर हे दाम्पत्य गेली ३० वर्षे आसाममधील चहाच्या मळ्यातील अतिमागास जनजाती मजुरांच्या शैक्षणिक सेवाकार्यात रममाण झाले आहेत. त्यांच्या कामाची दखल घेत पुण्यातील मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे त्यांना ६ ऑगस्ट रोजी एक लक्ष रुपयांचा 'वा. ना. अभ्यंकर गुरुगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येत आहे. यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा सविस्तर परिचय करून देणारा हा लेख.-**



पूर्वांचलात काम करणाऱ्या मराठी कार्यकर्त्यांची मांदियाळी मोठी आहे. त्यापैकी सलग तीन तपे तेथे राहून काम करण्याची प्रदीर्घ तपश्चर्या करणाऱ्या मोजक्या मंडळींपैकी अशोकराव व अलकाताई वर्णेकर हे नागपूरचे एक आगळेवेगळे दाम्पत्य. आसाममधील चाय बागान आदिवासी जनजातीच्या प्रश्नांकडे समाजाचे व शासनाचे लक्ष वेधण्याचे मोठे कार्य त्यांच्या ३० वर्षांच्या मूलभूत कामामुळे घडून येत आहे. साऱ्यांसाठी भूषणावह असलेले हे सेवाकार्य व्यापक समाजापुढे आणण्याचे काम मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या 'गुरुगौरव पुरस्कारा'मुळे घडून येते आहे.

अशोकराव वर्णेकर यांचे वडील श्रीधर भास्कर वर्णेकर हे मोठे संस्कृत पंडित होते. अशोक वर्णेकर मूळचे नागपूरकर. त्यांचा जन्म २० सप्टेंबर १९५० चा. शिक्षण एम.एस्सी. (संख्याशास्त्र) व एम.एस्सी. (अर्थशास्त्र). शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी नागपूरच्या इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमध्ये दीड वर्षे नोकरी केली व नंतर दोन वर्षे नागपूर विद्यापीठात अध्यापन केले. मे १९७७ मध्ये लग्न झाल्यावर पुढच्याच वर्षी ते मुंबईत दाखल झाले. तेथील दोन वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी वेगळी वाट चोखाळावी म्हणून इकॉनॉमिक टाईम्सच्या रिसर्च ब्युरोत पत्रकार म्हणून काम केले. अलकाताई यांचा जन्म १९५६ सालातील. अलकाताईंनी एम.एस्सी. (संख्याशास्त्र) केले. १९७६ च्या आंध्रवादळाच्या मदतकार्यात अलकाताईंचा सक्रिय सहभाग होता.

**अरुणाचल प्रदेशात... :** सामाजिक काम करण्याची अनेक वर्षांची इच्छा पूर्ण करण्यासाठी अशोकराव वर्णेकर यांनी १९८० मध्ये त्यांचा मुलगा अवघा दीड वर्षांचा असताना मुंबई सोडून अरुणाचलमध्ये पत्नीसह जाण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यावेळेस ते मुंबईत अगदी स्थिरस्थावर होण्याच्या मार्गावर होते. आरंभी अरुणाचल प्रदेशातील सेजोसा येथील विवेकानंद केंद्र विद्यालयात (व्हीकेव्ही) दोघांनी दोन वर्षे अध्यापक म्हणून ठरवून काम केले. स्थानिक समाजात अधिकाधिक मिसळण्याची संधी मिळावी म्हणून पुढील दोन वर्षे वर्णेकर यांनी डोनी पोलो विद्याभवनमध्ये प्राचार्य म्हणून काम केले. १९८४ मध्ये वर्णेकर यांनी डोनी पोलो मिशन स्कूलमधील नोकरी थांबवून नहारलगून येथे विद्यार्थी प्रावीण्य वर्ग 'अरुणाचल युथ सेंटर' या नावाने चालू केला.

**आसाममधील कामास सुरुवात :** १९८८ मध्ये मुंबईची सदनिका विकून त्यांनी लखीमपूर जिल्ह्यातील पार्वतीपूर(हारमती) येथे सुमारे एक एकर जागा विकत घेतली. तेथे लगेचच चाय बागान आदिवासी जनजाती समाजातील मुला-मुलींसाठी भास्कर संस्कार केंद्र सुरू केले. १९८८ ते एप्रिल २००० पर्यंतचा १२ वर्षांचा पार्वतीपूर येथील कामाचा त्यांचा पहिला टप्पा. नंतर २००८ पर्यंत त्यांना आई-वडिलांच्या आजारपणामुळे महाराष्ट्रात घरी थांबावे लागले होते. याच दरम्यान ते कौटुंबिक जबाबदाऱ्यांतून मुक्त झाले आणि पार्वतीपूरला परतले.

आसाम राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या २० टक्के हा चाय बागान आदिवासी जनजाती समाज आहे. या समाजाला विशिष्ट नावच नाही. खरे तर या समाजाला ओळखच नाहीये! जवळपास दोनशे वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी विविध राज्यांतून फसवून/पळवून चहाच्या मळ्यात आणलेले मजूर/गुलाम लोक हीच यांची खरी ओळख. तेलंगणा, विदर्भ, मध्यप्रदेश, झारखंड, ओडिशा, बिहार व बंगाल या राज्यांमधून फसवून, धाक अथवा प्रलोभने देऊन मोठ्या संख्येत आणला गेलेला हा मागास जातीतील मजूरवर्ग आहे आणि तो आसाममधील दुसऱ्या क्रमांकाचा प्रमुख समाज आहे.

**भास्कर संस्कार केंद्राची सुरुवात :** १९८८ मध्ये भास्कर संस्कार केंद्राची सुरुवात झाली. या समाजातील मुलांना शाळेची गोडी लावणे गरजेचे असले तरी जिकिरीचे होते. सध्या ७० मुले संस्कार केंद्रात निवासी असतात. चौथी ते महाविद्यालयीन शिक्षण घेणारी ही मुले आहेत. शरीर, मन व बुद्धी सतेज बनविण्यावर संस्कार केंद्रात भर असतो.

**प्राथमिक शाळेची सुरुवात :** १९९१ मध्ये लहान मुलांची शाळा चालू झाली. सुरुवातीला शाळेच्या चार झोपड्या बनल्या. संस्कार केंद्रात येणाऱ्या मुलांना त्यांच्या लहान भाऊ-बहिणींना पाठवण्यास सांगितल्यावर लहान मुलांचे येणे सुरू झाले. १९९९च्या सुमारास वनवासी कल्याण आश्रमाच्या सहकार्याने अनौपचारिक पद्धतीने चालणारी शाळा औपचारिक पद्धतीने नियमित भरायला लागली. आता तेथे बालगट ते ५ वी पर्यंत आसामी भाषेतील विद्याभारतीच्या अभ्यासक्रमावर आधारित प्राथमिक शाळा नित्य भरत असते. यात १८० अनिवासी विद्यार्थी येतात.

२०१० पर्यंत इथे बांबूच्या इमारती होत्या. टप्प्याटप्प्याने सिमेंटच्या पक्क्या इमारती बांधणे सुरू आहे. या इमारतींसाठी देणग्या उभारण्यात व शाळा चालविण्यात नागपूरच्या उत्थान न्यासाचे मोठे योगदान आहे. नागपुरातील बजाजनगर प्रभात संघशाखेचीही मोलाची साथ आहे. लवकरच स्थानिक न्यासाची निर्मिती करून त्याकडे शाळा व्यवस्थापन व जागा हस्तांतरणासाठी पाठपुरावा चालू आहे.

ख्रिश्चन धर्मांतराचा मोठा धोका या समाजाला आहे. शासनाने पुढाकार घेऊन सदानी लोकांसाठी गेल्या दोन वर्षांमध्ये दोन टप्प्यात १८० शाळा उघडल्या आहेत. सध्या त्या ८ वी पर्यंत असून लवकरच १० वी पर्यंत होतील अशी अपेक्षा आहे. ही आशादायक घडामोड असली तरी शैक्षणिक गुणवत्ता हे मोठे आव्हान आहे. राष्ट्रवादी विचारधारेशी जवळीक सांगणाऱ्या संस्थांनी या समाजासाठी चालू करणे गरजेचे आहे. त्यातून सदानी समाजातील नव्या पिढीमध्ये आत्मसन्मान जागविण्याचे काम करता येईल. ■

९४२२२३१९६७

## वेध

**नीलेश जोशी**

# पायी चालण्यावर जागोजागी 'अतिक्रमण'

सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्देशांमुळे देशातील शहरे, नगरपरिषदा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसमोर एक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आव्हान उभे राहिले आहे. या निर्णयात न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, जिथे रस्ता आहे तिथे पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त जागा असलीच पाहिजे. यासाठी मोठ्या निधीची किंवा नवीन प्रकल्पांची वाट न पाहता आवश्यक असल्यास दोरी लावूनही पदपथ अर्थात फूटपाथ वेगळा करा, पण पादचाऱ्यांना सुरक्षित पायी चालण्याच्या हक्कावर अतिक्रमण होऊ देऊ नका.

भारतातील बहुतांश शहरांमध्ये रुंद रस्ते, उड्डाणपूल आणि वाहनांसाठी अधिक जागा निर्माण झाल्या आहेत. मात्र ही सुविधा उभारताना शहरातील अंतर्गत मार्गांवर पायी चालणारा नागरिक कायमच दुय्यम ठरला आहे. अनेक शहरांत पदपथच नाहीत. जिथे आहेत तिथे दुकाने, फेरीवाले, पार्किंग किंवा बांधकाम साहित्याने ते व्यापलेले असतात. परिणामी नागरिकांना जीव धोक्यात घालून मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. रस्ते अपघातांच्या आकडेवारीतही ही वस्तुस्थिती दिसून येते. शासनाच्या रस्ते अपघात अहवालानुसार २०२४ साली रस्ते अपघातात १ लाख ७७ हजार १७५ लोकांचा मृत्यू झाला. यात ३६ हजार ५२६ मृत्यू पायी चालणाऱ्या व्यक्तींचे होते. ही संख्या टक्केवारीनुसार २०.०६ इतकी आहे. २०२३ साली देखील ३६ हजार २०३ पादचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. म्हणजेच रस्त्यांवरील सर्वांत असुरक्षित घटक हा पायी चालणारा नागरिक आहे. वाहनांसाठी नियम, लेन, सिग्नल आणि सुरक्षा उपाय आहेत, पण पादचाऱ्यांसाठी सुरक्षित जागाच नसणे हे दुर्दैव नव्हे का? सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही पायी चालणे हा मूलभूत अधिकाराचा भाग असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र यावेळी न्यायालयाने प्रत्यक्ष अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. दोन आठवड्यांत संबंधित यंत्रणांनी कृती आराखडा सादर करावा, असे आदेश देत न्यायालयाने प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.

महाराष्ट्रातील अनेक शहरांत प्रमुख रस्त्यांवर पदपथ अस्तित्वातच नाहीत. जिथे आहेत, तिथे अतिक्रमण, अनधिकृत पार्किंग किंवा विविध व्यावसायिक वापरामुळे ते पादचाऱ्यांसाठी उपयोगी ठरत नाहीत. अशा ठिकाणी वृद्ध, महिला, दिव्यांग, विद्यार्थी आणि लहान मुलांना दररोज जीव मुठीत धरून चालावे लागते. मुख्यतः जिथे पादचारी मार्ग आहे तिथे झालेले अतिक्रमण हा त्या-त्या शहराचा कळीचा मुद्दा आहे.

यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नियोजित फेरीवाला क्षेत्रे, पर्यायी जागा आणि प्रभावी वाहतूक नियोजन यांचा समतोल साधला पाहिजे. मात्र कोणत्याही परिस्थितीत पदपथावर कायमस्वरूपी अतिक्रमण हे मूलभूत व्यवस्था कोलमडणारे ठरत असल्याने याबाबत कठोर निर्णय घ्यावेच लागतील.

यासंदर्भात नागरिकांची देखील जबाबदारी आहेच. अनेकदा वाहनचालक स्वतःच पदपथावर वाहने उभी करतात. दुकानदार त्यांच्या दुकानातील वस्तू पदपथावर ठेवतात. काही ठिकाणी तर नागरिक पदपथाऐवजी रस्त्यावरून चालणे पसंत करतात. त्यामुळे प्रशासनाच्या उपाययोजना सोबतच नागरिकांनी देखील जबाबदारीचे भान ठेवणे तितकेच आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने पादचाऱ्यांच्या मूलभूत हक्कासाठी दिलेल्या निर्देशांचे स्वागतच केले पाहिजे. मात्र या संदर्भात अंमलबजावणी किती प्रामाणिकपणे होते, हे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा न्यायालयीन आदेश काही दिवस चर्चेत राहतात आणि नंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. या वेळी तसे होऊ नये. प्रत्येक शहराने पदपथांचे सर्वेक्षण करून अतिक्रमणमुक्ती, देखभाल आणि नवीन पदपथ उभारणीसाठी प्रामाणिकपणे पुढाकार घ्यावा. खरं म्हणजे पदपथ हा पादचाऱ्यांचा मूलभूत नागरी हक्क आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारा सर्वांत दुर्लक्षित, उपेक्षित घटक असणाऱ्या पादचाऱ्यांकरिता सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले. याच्या अंमलबजावणीची जबाबदारी आता प्रशासनाची आहे. पण प्रशासन करेल या अपेक्षेत न राहता नागरिक आणि लोकप्रतिनिधींना देखील या निर्देशांबाबत आग्रही व्हावे लागेल. तरच पादचारी मार्गावरील अतिक्रमण हटवून 'रस्त्यांवर पहिला अधिकार माणसांचा आहे, वाहनांचा नाही' आणि 'पायी चालणे हा मूलभूत अधिकार आहे' हा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला संदेश उपयोगी ठरेल. ■

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# विधानसभा पोटनिवडणूक निकालाचा अन्वयार्थ

बिहार, गुजरात आणि मध्यप्रदेशातील विधानसभेच्या तीन जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीच्या निकालाची सध्या चर्चा आहे. बिहारमधील बांकीपूर येथे भाजपाचा पराभव झाला. मध्यप्रदेशातील दतिया येथे काँग्रेस जिंकली तर गुजरातमध्ये भाजपाने विजय मिळविला. तीन मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपाला दोन जागा गमवाव्या लागल्या, फक्त एक जागा जिंकता आली. क्रिकेटच्या भाषेत सांगायचे तर दोन एकने भाजपाने ही मालिका गमावली. दोन राज्यातील भाजपाच्या पराभवाचा त्या राज्यातील भाजपाला धक्का बसला असला, तरी त्याचा त्या राज्यातील भाजपा सरकारच्या स्थैर्यावर मात्र कोणताही परिणाम होणार नाही, तरीही या निवडणुकीतील विशेषतः बांकीपूर मतदारसंघातील भाजपाच्या पराभवाची चर्चा होणार आहे.

गुजरातमधील मंजालपूरची जागा भाजपाची होती; ती भाजपाने कायम राखली. मध्यप्रदेशातील दतियाची जागा काँग्रेसची होती; ती काँग्रेसने पुन्हा जिंकली. फक्त बिहारच्या बांकीपूरची जागा भाजपाला गमवावी लागली. सामान्यपणे कोणत्याही राज्यात होणाऱ्या पोटनिवडणुकीत सत्ताधारी पक्ष जिंकत असतो. बिहार आणि मध्यप्रदेशात भाजपाची सत्ता आहे, त्यामुळे या राज्यातील दोन्ही पोटनिवडणुका भाजपाने जिंकणे अपेक्षित होते. मात्र, या दोन्ही ठिकाणी भाजपाचा पराभव झाला. त्यामुळे भाजपाला या दोन्ही पराभवाचे चिंतन आणि मंथन करावे लागणार आहे. बिहारमध्ये आतापर्यंत भाजपा सत्तेत असला, तरी मुख्यमंत्रिपद जदयुकडे म्हणजे नितीशकुमार यांच्याकडे होते. यावेळी प्रथमच मुख्यमंत्रिपद भाजपाला मिळाले आणि सम्राट चौधरी मुख्यमंत्री झाले.

भाजपा कोणतीही निवडणूक पूर्ण गांभीर्याने आणि तयारीने लढवत असतो. मात्र बाकीपूरची पोटनिवडणूक लढवताना कोणत्या तरी टप्प्यावर भाजपाकडून गफलत झाली, असे निवडणूक निकालावरून म्हणावेसे वाटते. राष्ट्रीय अध्यक्षाचा हा मतदारसंघ असल्यामुळे या मतदारसंघात भाजपाकडून अधिक खबरदारी घेणे अपेक्षित होते. याठिकाणी एकतर भाजपाला अतिआत्मविश्वास नडला वा भाजपाने ही निवडणूक पूर्ण गांभीर्याने लढली नाही, असे म्हणायला जागा आहे. बिहारच्या बांकीपूरचा भाजपाचा पराभव हा अनपेक्षित आणि धक्कादायक म्हणावा लागेल. भाजपाचा बालेकिल्ला म्हणून हा मतदारसंघ ओळखला जात होता. नितीन नवीन यांचे वडील नवीन किशोर सिन्हा या मतदारसंघातून सलग चार वेळा जिंकले, तर नितीन नवीन पाच वेळा या मतदारसंघातून विजयी झाले आहे. १९९५ पासून हा मतदारसंघ भाजपाकडे होता. यावरून या मतदारसंघातील भाजपाच्या पराभवाचे गांभीर्य लक्षात येईल. मंजालपूरमध्ये भाजपाचे विद्यमान आमदार योगेश पटेल यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाल्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. या मतदारसंघात भाजपाचे सतीशभाई पटेल विजयी झाले. २०१२ पासून हा मतदारसंघ भाजपाकडे होता. पोटनिवडणुकीत भाजपाने तो आपल्याकडे कायम राखला.

मध्यप्रदेशातील दतियाची पोटनिवडणूक काँग्रेस आमदार राजेंद्र भारती यांना अपात्र ठरवल्यामुळे घ्यावी लागली. काँग्रेसने दतिया राजघराण्यातील कुंवर घनश्यामसिंह यांना उमेदवारी दिली तर भाजपाने आशुतोष तिवारी यांना, या मतदारसंघातील निवडणूक भाजपाच्या उमेदवारीमुळे गाजली होती. माजी गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांचा हा मतदारसंघ.

मागील निवडणुकीत मिश्रा यांचा पराभव झाला, यावेळी उमेदवारीसाठी नरोत्तम मिश्रा इच्छुक होते, पण भाजपाने त्यांना उमेदवारी न देता आशुतोष तिवारी यांना उमेदवारी दिली. त्यामुळे मिश्रा यांचे समर्थक संतापले आणि त्यांनी आक्रमक पद्धतीने आपला निषेध व्यक्त केला. या मतदारसंघातील पोटनिवडणूक चर्चेत आली आणि भाजपासाठी प्रतिष्ठेची झाली होती, पण या ठिकाणी भाजपाचा पराभव झाला.

याचाच अर्थ भाजपाच्या प्रदेश नेतृत्वाने आशुतोष तिवारी यांची या मतदारसंघावर थोपलेली उमेदवारी भाजपा कार्यकर्त्यांना मान्य नव्हती, या पराभवाचे खापर मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यावर फुटू शकते तसेच त्यांच्या नेतृत्वक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकते. कोणत्याही निवडणुकीत वा पोटनिवडणुकीत पक्षाचा उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असते. या जबाबदारीत बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव कमी पडले, हे निश्चित.

दतियापेक्षाही बांकीपूर विधानसभा मतदारसंघातील पराभव भाजपासाठी धक्कादायक म्हणावा लागेल. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचा विधानसभा मतदारसंघ भाजपाला कायम राखता आला नाही, असा याचा अर्थ निघतो.

बांकीपूरमध्ये जनसुराज्य पक्षाचे प्रशांत किशोर विजयी झाले. निवडणूक व्यवस्थापन तज्ज्ञ अशी प्रशांत किशोर यांची ओळख आहे. आतापर्यंत राजकीय पक्षाच्या नेत्यांना आणि त्यांच्या पक्षाला निवडणूक जिंकून देण्याचा ठेका घेणाऱ्या म्हणजे किंगमेकर असणाऱ्या प्रशांत किशोर यांना किंग होण्याची स्वप्न पडू लागली आणि त्यांनी जनसुराज्य पक्षाची स्थापना केली. काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनसुराज्य पक्षाचा धुव्वा उडाला. एकही जागा त्याला जिंकता आली नाही. एवढेच काय, त्यांच्या जवळपास सर्व उमेदवारांची जमानत जप्त झाली. त्यावेळी विधानसभा निवडणूक न लढवणाऱ्या प्रशांत किशोर यांना नितीन नवीन यांच्या राजीनाम्यामुळे झालेल्या पोटनिवडणुकीतून आपले राजकीय नेतृत्व प्रस्थापित करण्याची चांगली संधी मिळाली, असे म्हणावे लागते.

प्रशांत किशोर यांच्या विजयाचा भाजपाला बसलेला फटका हा तात्कालिक स्वरूपाचा म्हणावा लागेल. पण बिहारच्या राजकारणात प्रशांत किशोर यांच्या झालेल्या उदयाचा खरा फटका राष्ट्रीय जनता दलाला दीर्घ काळासाठी बसणार आहे. बिहारच्या राजकारणातील त्या पक्षाचा प्रभाव कमी होणार आहे. बांकीपूर पोटनिवडणुकीत राजदच्या रेखा गुप्ता तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्या. बांकीपूरमध्ये आपला पराभव होणार, याची कल्पना राजदचे तेजस्वी यादव यांना आधीच आली असावी, त्यामुळे निवडणूक प्रचारारादरम्यान पक्षाला वाऱ्यावर सोडत तेजस्वी यादव परदेशात निघून गेले.

बिहारच्या राजकारणात प्रशांत किशोर यांच्या पक्षाचा प्रभाव जेवढा वाढेल, तेवढा राजदचा प्रभाव कमी होणार आहे. बांकीपूरमध्ये राजद उमेदवार जसा तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला, तसाच राज्याच्या राजकारणात राजद तिसऱ्या वा चौथ्या स्थानावर फेकला गेला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्यामुळे भाजपाच्या पराभवामुळे राजदने जास्त उड्या मारण्याची गरज नाही तसेच भाजपाने हताश होण्याचेही कारण नाही. राजदने स्वतःच्या पराभवाचे आत्मचिंतन केले पाहिजे. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### हिरोशिमाचा इशारा आणि युद्धाच्या उंबरठ्यावरचे जग

६ ऑगस्ट हा दिवस जगाच्या इतिहासातील सर्वांत वेदनादायी दिवस म्हणून स्मरणात आहे. १९४५ मध्ये जपानमधील हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकण्यात आला. एका क्षणात शहर भस्मसात झाले. हजारो लोक मृत्युमुखी पडले आणि पुढील अनेक पिढ्यांपर्यंत किरणोत्सर्गाचे दुष्परिणाम भोगावे लागले. तीन दिवसांनी नागासाकीवर दुसरा अणुबॉम्ब टाकण्यात आला. विज्ञानाची सर्वोच्च उपलब्धी मानवतेच्या विनाशासाठी वापरली गेली, ही शोकांतिका आजही जगाला अस्वस्थ करते.

हिरोशिमा दिवस केवळ भूतकाळातील दुःखद घटना आठवण्यासाठी नाही, तर युद्धाचे भयावह परिणाम विसरू नयेत यासाठी दिवस स्मरणाचा केला जातो. परंतु प्रश्न असा आहे की, जगाने खरंच या घटनेतून काही शिकले आहे का? आज जग पुन्हा अस्थिरतेच्या टप्प्यावर उभे आहे. युक्रेन-रशिया युद्ध, मध्यपूर्वेतील संघर्ष, चीन-तैवान तणाव आणि महासत्तांमधील वाढती स्पर्धा यामुळे जागतिक शांतता धोक्यात आली आहे. मध्यपूर्वेतील संघर्षाचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी. पर्शियन आखातातून जगभर जाणाऱ्या कच्च्या तेलाचा आणि द्रवीकृत नैसर्गिक वायूचा मोठा हिस्सा या अरुंद समुद्री मार्गातून वाहतूक केला जातो. त्यामुळे इराण–इस्त्रायल संघर्ष तीव्र झाल्यास किंवा होर्मुझची सामुद्रधुनी बंद होण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास जागतिक तेलपुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. परिणामी कच्च्या तेलाच्या किमती वाढणे, महागाई वाढणे आणि भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांच्या अर्थव्यवस्थेवर दबाव येणे, अशा परिणामांची भीती व्यक्त केली जाते.

डोनाल्ड ट्रम्प यांचे 'अमेरिका प्रथम' धोरण अमेरिकेच्या आर्थिक हितांना प्राधान्य देते. त्यामुळे आयात शुल्क वाढवणे, व्यापार करारांचा फेरविचार करणे आणि इतर देशांवर आर्थिक दबाव टाकणे या गोष्टींना चालना मिळाली आहे. २०२६ मध्ये भारतावरील काही अमेरिकी शुल्कांबाबत चर्चा आणि बदल झाले असून भारतीय निर्यातदारांना त्याचा परिणाम जाणवत आहे. विशेषतः वस्त्रोद्योग, रसायने, अभियांत्रिकी उत्पादने आणि इतर निर्यात क्षेत्रांसमोर अनिश्चितता निर्माण झाली आहे. आजच्या काळात युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही. आर्थिक निर्बंध, सायबर हल्ले, ड्रोन, क्षेपणास्त्रे, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शस्त्रे, माहितीचे युद्ध आणि अण्वस्त्रांच्या धमक्या हे संघर्षाचे नवे आयाम बनले आहेत. त्यामुळे हिरोशिमाची आठवण अधिकच महत्त्वाची ठरते. हिरोशिमा आपल्याला एक मूलभूत प्रश्न विचारते की मानवजातीची खरी ताकद विनाशात आहे की संवादात? युद्ध सुरू करणे सोपे असते, पण शांतता प्रस्थापित करणे अत्यंत कठीण असते. म्हणूनच जगातील सर्व महासत्तांनी सामर्थ्याचे प्रदर्शन करण्याऐवजी परस्पर संवाद, मुत्सद्देगिरी आणि सहकार्य यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

हिरोशिमा दिवसाचे स्मरण करताना आपण फक्त इतिहासाचे स्मरण करू नये , तर वर्तमानालाही प्रश्न विचारला पाहिजे. हिरोशिमा हा केवळ इतिहासातील एक दिवस नाही, तो मानवजातीसाठी कायमचा इशारा आहे. युद्धाची आग पेटवणे एका क्षणाचे काम असते, पण तिच्या राखेतून उभे राहण्यासाठी अनेक पिढ्या खर्ची पडतात. त्यामुळे शक्तीपेक्षा शहाणपण, संघर्षापेक्षा संवाद आणि युद्धापेक्षा शांतता हा मार्ग स्वीकारणे, हीच हिरोशिमा दिनानिमित्त मानवजातीला खरी आदरांजली ठरेल.

**डॉ. सुरुची डबीर**/९३७०६९६११७

■■■

### अभिमान कृषी व्यवसायाचा

भारत हा कृषिप्रधान देश आहे. परंतु इतर व्यावसायिकांना ते करीत असलेल्या व्यवसायाचा ज्याप्रमाणे अभिमान असतो, त्याप्रमाणे भारतीय कृषक करीत असलेल्या कृषी व्यवसायाचा कृषकवर्गाला अभिमान असतो का, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. बरेच लोक असे असतात की त्यांना ते करीत असलेल्या व्यवसायाचा अभिमान असतो. त्यांना विचारले की ते लगेच आपला व्यवसाय अभिमानाने सांगतात. 'माझे किराणा दुकान आहे, ज्वेलरी शॉप आहे' जे अल्प भूधारक असतात ते खाली मान घालून सांगतात की, 'आम्ही गरीब शेतकरी आहोत.' जे शेतकरी अल्प भूधारक नसतात, बरेच एकर जमीन त्याच्याकडे असते परंतु ते शेतीबरोबर इतर जोडव्यवसाय देखील करतात, त्यांना शेतीचा नव्हे तर त्यांच्या जोड व्यवसायाचा अभिमान असतो. भारत कृषी प्रधान देश आहे, परंतु कृषक वर्गाला आपण बरेच वर्षांपासून करीत असलेल्या शेती व्यवसायाचा अभिमान नाही, हा एकप्रकारे विरोधाभास ठरतो. मोठा उद्योग करणाऱ्या लोकांना उद्योगपती म्हणतात परंतु मोठ्या शेतकऱ्याला कोणी 'कृषी पती' म्हणत नाही. ही खरी कृषी प्रधान देशातील कृषक वर्गाची शोकांतिका आहे. ही शोकांतिका जर दूर होऊ शकली तर आपल्या कृषी प्रधान देशाची प्रतिष्ठा अधिक वाढेल. ■

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## उमरग्यात शेताच्या वादातून मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

शेताच्या वादातून एका कुटुंबाला शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी उमरगा पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तानाजी रेवा जाधव, छायाबाई तानाजी जाधव, अर्जुन जाधव (सर्व रा. बलसुर) आणि अविनाश चव्हाण (रा. लिंबाळा तांडा) अशी आरोपींची नावे आहेत.



२९ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास गुंजोटी येथे शेताच्या वादातून आरोपींनी फिर्यादी विमलबाई शिवाजी जाधव (वय ५५, रा. बलसुर तांडा) तसेच त्यांचे पती व मुलाला शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी, काठी व कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार ५ ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आली. त्यावरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही सामूहिक जबाबदारी : उषाताई गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**



शिक्षण हा समाजाच्या विकासाचा मजबूत पाया आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि संस्कारक्षम शिक्षण मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास आणि कौशल्य विकसित करण्यासाठी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा. शाळांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा तथा शिक्षण सभापती उषाताई रवींद्र गायकवाड यांनी केले.

मंगरूळ जिल्हा परिषद गटातील जि.प. प्राथमिक शाळा, आरळी बुद्रुक येथे सदिच्छा भेट देऊन त्यांनी शाळेतील शैक्षणिक कामकाजाची पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अध्ययनाची माहिती घेतली, विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला तसेच शिक्षकांशी चर्चा करून शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले.

भेटीदरम्यान त्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. अभ्यास, वाचन, स्वच्छता, शिस्त आणि नियमित उपस्थितीचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांच्या भविष्यातील ध्येयांविषयी जाणून घेतले. शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

यानंतर मुख्याध्यापक व शिक्षकांसोबत झालेल्या बैठकीत शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्ययन-अध्यापन पद्धती, शासनाच्या विविध शैक्षणिक योजना, मूलभूत सुविधा, स्वच्छता, वृक्षसंवर्धन तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्ये, संस्कार आणि कौशल्यांचा विकास होणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळेच्या परिसराची पाहणी करून उपलब्ध भौतिक सुविधांची माहिती घेत त्यांनी विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात शिक्षण मिळावे, शाळांमध्ये आधुनिक शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर व्हावा आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचावे यासाठी जिल्हा परिषद स्तरावर आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या सिमा माडजे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ. कोमल गरड-जाधव यांना न्याय देण्याची मागणी



### डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजनांची आयएमएची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ ऑगस्ट -**

उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड-जाधव यांना न्याय मिळावा तसेच शहरातील डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), उमरगाच्या वतीने उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

डॉ. कोमल गरड-जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार कथित धमकी, खंडणीची मागणी आणि विनयभंग प्रकरणी गुन्हा नोंद झाला असून, या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉक्टरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, या घटनेचा आयएमएने जाहीर निषेध केला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, डॉक्टर समाजाच्या आरोग्यसेवेसाठी दिवस-रात्र कार्यरत असतात. अशा परिस्थितीत वैद्यकीय अधिकाऱ्यांना धमक्या, दबाव, खंडणी किंवा छळाला सामोरे जावे लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित तक्रारदाराला न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात.

वैद्यकीय व्यवसाय हा समाजसेवेचा पाया असून डॉक्टरांच्या सुरक्षिततेची हमी ही सक्षम आरोग्य व्यवस्थेची पूर्वअट असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात तातडीने न्याय्य व प्रभावी कारवाई करून डॉक्टरांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करावे, अशी मागणी आयएमएने केली आहे.

या निवेदनावर आयएमए उमरगा तालुकाध्यक्ष डॉ. प्रशांत मोरे, उपाध्यक्ष डॉ. शुभांगी महाजन, सचिव डॉ. विजय बेडदुर्गे, माजी तालुकाध्यक्ष डॉ. अनंत मुगळे, कोषाध्यक्ष डॉ. सागर पतंगे, डॉ. अभय शिंदे, डॉ. नामदेव बिराजदार, डॉ. थिटे, डॉ. विजय पाटील, डॉ. विनोद जाधव, डॉ. लक्ष्मण सातपुते, डॉ. अनिकेत इनामदार, डॉ. उदय मोरे, डॉ. घोडके यांच्यासह शहरातील अनेक डॉक्टरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### आयएमएच्या प्रमुख मागण्य...

प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व जलदगतीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी., डॉ. कोमल गरड-जाधव यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी सहकार्य करावे., तपास प्रक्रियेवर कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा अन्य दबाव येऊ न देता निष्पक्ष तपास पूर्ण करावा., उमरगा उपजिल्हा रुग्णालयासह सर्व डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करावी., डॉक्टर व महिला डॉक्टरांवरील धमकी, मारहाण, विनयभंग आणि खंडणीच्या घटनांबाबत 'झिरो टॉलरन्स' (शून्य सहनशीलता) धोरण राबवावे., भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने अमलात आणाव्यात.

# परंडा शहराला नवा डी.पी. रस्ता मिळणार? व्यापारी संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ ऑगस्ट -**

परंडा शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करून ग्रामीण भागाशी सुलभ संपर्क निर्माण करण्यासाठी मंडई पेठ येथील मुख्य रस्ता ते छत्रपती संभाजी महाराज चौक (सोनारी रोड) हा डी.पी. (डेव्हलपमेंट प्लॅन) रस्ता तातडीने विकसित करण्यात यावा, अशी मागणी व्यापारी संघटना, शहरातील नागरिक आणि शेतकरी वर्गाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या सोनारी रोडवरून शहरात येणारी वाहतूक आगरकर गल्ली व मोमीन गल्लीमार्गे मंडई पेठेत प्रवेश करते. या मार्गावर रस्ता अरुंद असल्याने चारचाकी वाहनांना मोठी अडचण निर्माण होते आणि वारंवार वाहतूक कोंडीची समस्या उद्भवते. परंडा शहर भौगोलिकदृष्ट्या पश्चिम महाराष्ट्राच्या सीमेवर असून उत्तरेकडील सोनारी रोडमार्गे तालुक्यातील सुमारे ३० ते ४० गावे शहराशी जोडली जातात. तसेच शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यामुळे वाहनांना वळसा घालून मंडई पेठेत प्रवेश करावा लागतो. त्यामुळे छत्रपती संभाजी महाराज चौक (सोनारी रोड) ते टिपू सुलतान चौक असा नवीन डी.पी. रस्ता झाल्यास शहराची कनेक्टिव्हिटी वाढेल, वाहतूक सुरळीत होईल आणि शहराचा संतुलित विकास साधता येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या रस्त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांना शहरात ये-जा करणे अधिक सोयीचे होणार असून मुख्य बाजारपेठ, एसटी स्थानक, पोस्ट कार्यालय, ग्रामीण रुग्णालय तसेच विविध बँकांशी थेट संपर्क उपलब्ध होईल, असेही व्यापारी संघटनेने म्हटले आहे.

यावेळी व्यापारी संघटनेचे पदाधिकारी, व्यापारी तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परंडा शहर विकासासाठी नवीन डी.पी. रस्त्याचा प्रयत्न करू : नगराध्यक्ष जाकीर सौदागर



राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या तसेच आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली परंडा शहराचा आदर्श विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. व्यापारी संघटनेने दिलेल्या निवेदनाची दखल घेऊन नगरपरिषदेच्या माध्यमातून नवीन डी.पी. (डेव्हलपमेंट प्लॅन) रस्ता मंजूर व विकसित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी व्यापारी संघटनेशी चर्चा करताना दिले.

## ३६४ वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी ५ ऑगस्ट रोजी शहरातील प्रमुख रस्त्यांवर विशेष मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध ३६४ कारवाया केल्या.

# पीक विमा अर्जाची मुदत १० ऑगस्टपर्यंत वाढली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

खरीप हंगामातील पिकांना नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळावे यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलैवरून १० ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

बाजरी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस, मका व खरीप कांदा पिकांची लागवड केलेल्या कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे कृषी विभागाने आवाहन केले आहे.



अर्जासाठी स्वयंघोषणापत्र, सातबारा व ८-अ उतारा, आधार कार्ड, सीळींरलज्ञ ऋीशी खऊ आणि बँक पासबुकची प्रत आवश्यक असून, शेतकरी आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी किंवा संबंधित बँकेमार्फत ऑनलाइन अर्ज करू शकतात.

अंतिम दिवसाची वाट न पाहता तातडीने अर्ज करून पिकाला विमा संरक्षण मिळवावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी केले आहे.

## अवैध गावठी दारूसह महिला ताब्यात; २० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा शिवारातील माणिकदंड येथे अवैध गावठी दारू विक्रीसाठी साठवून ठेवल्याप्रकरणी येरमाळा पोलिसांनी आक्काबाई धनंजय शिंदे (वय ४०, रा. इंदापूर, ता. वाशी, ह.मु. माणिकदंड, तेरखेडा शिवार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

५ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्या राहत्या पत्र्याच्या शेडसमोरून सुमारे २० हजार २०० रुपये किमतीची २०० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली.

# तुळजापूरातील खड्डेमय रस्त्यांवर मनसे आक्रमक; आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची दिवसेंदिवस बिकट होत चाललेली अवस्था आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. तालुक्यातील जीर्ण, खड्डेमय आणि धोकादायक रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तुळजापूर कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेने दिला आहे.

यासंदर्भात मनसेचे जिल्हाध्यक्ष महेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात तालुक्यातील अनेक प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था अधोरेखित करण्यात आली. मनसेने म्हटले आहे की, तुळजापूर-ढेकरी, आरळी खुर्द-आरळी बुद्रुक-काळेगाव, कुंभारी-मंगरूळ, धनगरवाडी-अणदूर, चिवरी तसेच खुदावाडी-जंपूर या मार्गांसह तालुक्यातील अनेक महत्त्वाचे रस्ते मोठ्या खड्ड्यांनी व्यापले असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या दोन वर्षांपासून स्थानिक नागरिकांकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोपही करण्यात आला. रस्त्यांच्या खराब अवस्थेमुळे दररोज लहान-मोठे अपघात होत असून विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खराब रस्त्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.करोडो रुपयांचा निधी मंजूर होऊनही प्रत्यक्षात दर्जेदार कामे होत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी मनसेने केली आहे. कामे पूर्ण झाल्यानंतर काही महिन्यांतच पुन्हा खड्डे पडण्याची पुनरावृत्ती सहन केली जाणार नसल्याचा इशाराही देण्यात आला. निर्धारित मुदतीत कामे सुरू झाली नाहीत, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तुळजापूर कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असा स्पष्ट इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला.



यावेळी जिल्हाध्यक्ष महेश जाधव, मयूर गाढवे, मल्लिकार्जुन कुंभार, धर्मराज सावंत, धनाजी साठे, सोमनाथ आलुर, शशिकांत तांबे, समीर शेख, रूपी माने, लक्ष्मण सुखशे आणि विशाल माने यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.


### जाहीर प्रगटनाद्वारे समन्स
### उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

**वादप्रश्न नक्की करण्यासाठी समन्स (नियम ५, नियम १,५)**

**संक्षिप्त दिवाणी दावा क्र. ०१/२०२६**
**अजित वि. निलेश**
**निशाणी क्र. ८**

**प्रति,**
**प्रतिवादी**
**निलेश सिद्राम तुकशेट्टी**
**रा. मुळज, ता. उमरगा, जि. धाराशिव.**

ज्याअर्थी वादी **अजित मोहनराव माने, रा. माडज, ता. उमरगा, जि. धाराशिव,** यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १०/०९/२०२६** रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तर देवू शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर केम) ज्या दस्त आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम) पुष्ठयर्थ पुरावा म्हणुन तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबुन असाल तर अशा दस्तऐवजाचे एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे. तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.
**आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**स्वाक्षरित/-**
**(एस.एन. यमगर)**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(डी.व्ही. गायकवाड)**
**सहा.अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय व. स्तर, उमरगा.**


# ओंकार साखर कारखान्याविरोधात आंदोलनाचा एमआयएमचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ ऑगस्ट -**

अक्कलकोट येथील ओंकार साखर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याचा आरोप एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शहबाज काझी यांनी केला आहे. जानेवारी महिन्यात गाळपासाठी गेलेल्या ऊसाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले नसून एफआरपीनुसार ऊस बिलही देण्यात आले नसल्याचा दावा त्यांनी केला.

या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कारखान्यावर कारवाई करावी, अन्यथा एमआयएमच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. काझी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अक्कलकोट येथील ओंकार साखर कारखान्याकडून तुळजापूर तालुक्यासह परिसरातील अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. कारखान्याने ऊस बिल देताना दुजाभाव केल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की, नोव्हेंबर महिन्यापर्यंत गाळप झालेल्या ऊसाला प्रतिटन २,९०० रुपये दर देण्यात आला, तर जानेवारी महिन्यात गाळप झालेल्या ऊसाला केवळ १,८०० रुपये दर देण्यात आला. याशिवाय जानेवारी महिन्यात गाळप केलेल्या ऊसाचे देयक अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्याचा आरोपही त्यांनी केला. पैसे मिळविण्यासाठी शेतकरी वारंवार कारखान्याच्या फेऱ्या मारत असून, आज देतो, उद्या देतो अशी आश्वासने देऊन त्यांना परत पाठविले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.



गाळप झालेल्या ऊसाचे थकीत पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावेत. अन्यथा एमआयएमच्या वतीने ओंकार साखर कारखान्यासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा काझी यांनी दिला आहे.

## बसस्थानकासमोर वाहन उभे केल्याप्रकरणी गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

बसस्थानक समोरील सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा धोकादायक पद्धतीने चारचाकी वाहन उभे केल्याप्रकरणी लोहारा पोलिसांनी महेबुब करीम शेख (रा. मार्डी, ता. लोहारा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना ५ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ११.४० वाजता घडली. पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.


### तहसील तथा कार्यकारी दंडाधिकारी, परंडा
**बार्शी रोड परंडा पिनकोड ४१३ ५०२**
**दूरध्वनी क्रमांक (०२४७७) २३२०२४** Email.ID-tahparandagmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

**जा.क्र २०२६/महसूल/जन्म-मृत्यु नोंद/क्रमांक-** **दि.१५/०७/२०२६**

#### जाहिरनामा

ज्याअर्थी अर्जदार **चित्रा मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि.धाराशिव** याची जन्म **दिनांक ०१/०६/१९९४** रोजी मौ. ढगपिंपरी तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद ग्रामपंचायत कार्यालय ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीता आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार **चित्रा मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव** यांचा यांच्या जन्म दिनांक/जन्म स्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

**दिनांक / /२०२६ रोजी माझेसही व शिक्यानिशी दिले असे.**

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**परंडा**



### तहसील तथा कार्यकारी दंडाधिकारी, परंडा
**बार्शी रोड परंडा पिनकोड ४१३ ५०२**
**दूरध्वनी क्रमांक (०२४७७) २३२०२४** Email.ID-tahparandagmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

**जा.क्र २०२६/महसूल/जन्म-मृत्यु नोंद/क्रमांक-** **दि.१५/०७/२०२६**

#### जाहिरनामा

ज्याअर्थी अर्जदार **नाना मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि.धाराशिव** यांची **मुलगी नामे ज्ञानेश्वरी नाना वायकुळे जन्म दिनांक. १९/०३/२०१९** मौ. ढगपिंपरी, ता. परंडा, जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद ग्रामपंचायत कार्यालय ढगपिंपरी, ता. परंडा, जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीता आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार **नाना मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव** यांचा यांच्या जन्म दिनांक/जन्म स्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

**दिनांक / /२०२६ रोजी माझेसही व शिक्यानिशी दिले असे.**

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**परंडा**

## संक्षिप्त वृत्त...

### कोयंबतूर-जयपूर विशेष रेल्वेच्या आठ फेऱ्या; पूर्णा, नांदेडसह सहा स्थानकांवर थांबा

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे कोयंबतूर-जयपूर-कोयंबतूर दरम्यान साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस रेल्वेगाडीच्या एकूण आठ फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही सेवा तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०६१८१ कोयंबतूर-जयपूर विशेष ही १३ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रत्येक गुरुवारी धावणार असून एकूण चार फेऱ्या होणार आहेत. ही गाडी कोयंबतूर येथून पहाटे २.३० वाजता सुटून शनिवारी दुपारी १.२५ वाजता जयपूर येथे पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०६१८२ जयपूर-कोयंबतूर विशेष ही १६ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रत्येक रविवारी धावणार असून एकूण चार फेऱ्या होणार आहेत. ही गाडी जयपूर येथून रात्री १०.०५ वाजता सुटून बुधवारी सकाळी ८.३० वाजता कोयंबतूर येथे पोहोचेल.

एलएचबी रचनेतील २० डब्यांसह धावणारी ही विशेष रेल्वे नांदेड विभागातील मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशिम आणि अकोला या स्थानकांवर थांबणार आहे. त्यामुळे राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि तामिळनाडू या राज्यांदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या विशेष गाडीचा मोठा लाभ होणार आहे. या विशेष रेल्वेसाठी प्रवाशांनी अधिकृत रेल्वे संकेतस्थळ, रेल्वे आरक्षण केंद्रे किंवा ठरळश्रजपश पद्वारे आरक्षण करण्याचे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने केले आहे.

### पाणी आणण्यासाठी गेलेल्या युवकाचा विहिरीत बुडून मृत्यू

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील नवहट्टी तांडा येथे पाणी आणण्यासाठी विहिरीवर गेलेल्या १९ वर्षीय युवकाचा पाय घसरून विहिरीत पडल्याने बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी सकाळी सुमारे ७ वाजता घडली. भारत प्रकाश राठोड (वय १९) असे मृत युवकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भारत राठोड हा शेजारील शेतातील विहिरीवर पाणी आणण्यासाठी गेला होता. विहिरीतून पाणी काढत असताना त्याचा तोल जाऊन तो विहिरीत पडला. पोहता न आल्याने तो पाण्यात बुडाला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच चारठाणा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी पुंड यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

या प्रकरणी विश्वनाथ राठोड यांच्या खबरवरून चारठाणा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हवालदार कालवणे करीत आहेत.

### परभणी महापालिकेत चार स्वीकृत सदस्यांची निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी महानगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदासाठी चार सदस्यांची निवड बुधवारी विशेष सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात आली. महापालिकेच्या बी. रघुनाथ सभागृहात झालेल्या सभेत महापौर सय्यद इकबाल यांनी निवड झालेल्या सदस्यांची नावे घोषित केली.

परभणी महापालिकेच्या ६५ सदस्यीय सभागृहाची निवडणूक काही महिन्यांपूर्वी पार पडली होती. मात्र, स्वीकृत सदस्यांची नियुक्ती रखडल्याने हा विषय अनेक सर्वसाधारण सभांमध्ये चर्चेचा ठरत होता. अखेर राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या तरतुदीनुसार संबंधित पक्षांच्या गटनेत्यांनी केलेल्या शिफारशींवरून स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात आली. यामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून अंबिका डहाळे, शहर विकास आघाडीकडून राहुल मुरकुटे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून शेख फहाद आणि काँग्रेस पक्षाकडून विनोद कदम यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या नावांना विशेष सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली. सभेस महापालिका आयुक्त नितीन नार्वे कर, उपमहापौर गणेश देशमुख, नगरसचिव विकास रत्नपारखे यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. निवड झालेल्या स्वीकृत सदस्यांचे महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख आणि आयुक्त नितीन नार्वेकर यांनी अभिनंदन केले.

दरम्यान, नगरविकास विभागाच्या तरतुदीनुसार ६५ सदस्यीय महापालिकेत पाच ते सहा स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करता येते. त्यामुळे आणखी एक किंवा दोन स्वीकृत सदस्यांची नियुक्ती पुढील काळात होण्याची शक्यता आहे.

### मैसूर येथे जिमनॅस्टिकस्पर्धेत परभणीकरांची दमदार कामगिरी

**परभणी,/प्रतिनिधी :** कर्नाटकातील मैसूर येथे १ ते ३ ऑगस्टदरम्यान आयोजित राष्ट्रीय एक्रोबॅटिक जिमनॅस्टिक स्पर्धेत परभणीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ६ सुवर्ण, १४ रौप्य आणि २ कांस्य पदकांची कमाई केली. या यशामुळे महाराष्ट्र संघालाही उत्कृष्ट कामगिरीबद्दल सांघिक सुवर्णपदक मिळाले. ज्युनिअर गटात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दिग्विजय पाते, प्रज्वल अंबोरे, अनिल सिंदगे आणि श्रीसाई बोराडे यांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत दोन रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले.

# महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून लाहोटी यांचा गौरव

**सेलू,/प्रतिनिधी:-** महसूल दिनानिमित्त विभागीय स्तरावर उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून सेलू उपविभागाचे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांचा गौरव करण्यात आला. उपविभागात महसूल प्रशासन, भूसंपादन, अवैध रेती वाहतूक प्रतिबंध, निवडणूक व्यवस्थापन, ई-चावडी, जात प्रमाणपत्र वितरण, विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (), मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ते योजना, महसूल शिबिरे, घरकुल लाभार्थ्यांसाठी वाळू उपलब्धता तसेच विविध प्रशासकीय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला.



उपविभागात जालनानांदेड द्रुतगती महामार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून शेकडो प्रकरणांचे निवाडे करण्यात आले. अवैध रेती वाहतुकीवर कारवाई, कालबाह्य स्टोन क्रशरवर कार्यवाही, वेठबिगार मजुरांची सुटका, घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देणे, हद्दपार प्रकरणांवर निर्णय, निवडणुका शांततेत पार पाडणे, हजारो जात व नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्रांचे वितरण, महसूल शिबिरांचे आयोजन, ई-चावडी प्रणालीची अंमलबजावणी, कार्यक्रमातील उल्लेखनीय प्रगती, अपील प्रकरणांचा निपटारा, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मंजुरी, मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ते योजनेची अंमलबजावणी आणि आपले सरकार पोर्टलवरील अर्जांचा वेळेत निपटारा आदी कामगिरीची दखल घेण्यात आली.

यावेळी उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी म्हणाले, ''महसूल दिनानिमित्त विभागीय स्तरावर उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून झालेला माझा सन्मान हा केवळ माझा नसून संपूर्ण महसूल यंत्रणेचा आहे. या यशामागे सर्व तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, महसूल कर्मचारी, पोलिस पाटील, कोतवाल, शिपाई तसेच सर्व सहकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान, समर्पण आणि टीमवर्क आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या सहकार्याने भविष्यातही नागरिकांना अधिक पारदर्शक, परिणामकारक आणि लोकाभिमुख महसूल सेवा देण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.'' असे मनोगत व्यक्त केले.



## व्हॉइस ऑफ मीडियाच्या नवीन कार्यकारणीचा भारतीय जनता किसान मोर्चा जिंतूर च्यावतीने सत्कार

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील बोरी येथे भारतीय जनता किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष शिवाजी उर्फ दिनकर चौधरी आयोजित व्हॉइस ऑफ मेडिया जिंतूर ची नूतन कार्यकारणी बिनविरोध निवड झाल्याबद्दल पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती भाजपा ग्रामीण महिला मोर्चा माजी जिल्हाध्यक्ष डॉ.विद्याताई चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती यशवंतराव चौधरी, भाजपा युवा नेते सतीश भाऊ चौधरी ग्रामपंचायत सदस्य पूजाताई शिंपले. भाजप मंडळ अध्यक्ष अशोक शिंपले बोरी प्रेस क्लबचे अध्यक्ष आनंदजी मुरक्या बोरी सोसायटीचे सचिव वामनराव शिंपले बाबुभाई काझी मामू सुधाकर थोरात संदीप इखे सह ज्येष्ठ पत्रकार भास्करराव चौधरी व मार्गदर्शक रामभाऊ ढाकरगे या मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष म्हणून अमृतराव चौधरी यांनी पदभार स्वीकारला

या कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती म्हणून व्हॉइस ऑफ मीडिया जिंतूर कार्यकारणीचे नूतनअध्यक्ष सचिन रायपत्रीवार, सचिव दिलीप देवकर, कार्याध्यक्ष मुंजाजी कंठाळे, उपाध्यक्ष गणेशजी ठाकूर, सहसचिव तुकारामजी सर्जे, सह कोषाध्यक्ष संतोषी तायडे, सदस्य राजू गारकर, शिवानंद कंठाळे, संतोष लहाने, अशोक उकंडे यासह निवड झालेल्या कार्यकारणीचे सत्कार भारतीय जनता किसान मोर्चा तालुकाध्यक्ष दिनकर चौधरी यांच्यासह भारतीय जनता पार्टी बोरी यांच्यावतीने सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिनकर चौधरी म्हणाले या देशांमध्ये आजतयागत ज्या ज्या क्रांती घडल्या किंव्हा घडणार त्या क्रांतीमध्ये सर्वात मोठ पाऊल म्हणजे मीडियाच असते या पत्रकाराच्या आधारेच या देशाची लोकशाही जिवंत आहे व जिवंत राहणारच जोपर्यंत चंद्र सूर्य आहे तोपर्यंत हा पत्रकार माध्यम राहणार आहे त्याचबरोबर त्यांनी निवड झालेल्या पत्रकारांच्या कार्याबद्दल कौतुक करून त्यांनी पत्रकाराणा अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या

डॉ.चौधरी म्हणाल्या पत्रकार एक लोकशाहीचा जबाबदार स्तंभ आहे पत्रकार जागरूक राहिला तरच समाज जागा राहील अस त्यांनी मनोगत व्यक्त केले. यशवंतराव चौधरी म्हणाले देशातील व देश बाहेरील सर्व अचूक संदेश आपल्याला सांगणार माध्यम म्हणजे पत्रकारच होयच अशा आपल्या मनोगत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित म्हणून बोरी येथील पत्रकार व व्यापारी व सर्व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गंगाधर(भाऊ) देशमुख रणवीर आंभुरे .दीपक कनकुटे गणेश बुलबुले लोभानभाई पाशाबाई अनिल जैन कैलास चौधरी ज्ञानेश्वर राठोड रामभाऊ चव्हाण हे होते तर आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन कैलास घादगिने यांनी केले

## सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा शा जिंतूर येथे बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न....

**जिंतूर,/प्रतिनिधी-** सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा.शा. जिंतूर येथे आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी मंगळवार मालेगाव येथील इदारा इम्तिहान-ए-दिनियात यांच्यावतीने महाराष्ट्रातील विद्यार्थी साठी आयोजित करण्यात आलेल्या दिनियात परीक्षेत सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा.शा.जिंतूर येथील



विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत शाळेच्या यशस्वी परंपरेस भर घातली.
या उल्लेखनीय यशाबद्दल इदारा इम्तिहान -ए -दिनियात यांच्यावतीने यशस्वी विद्यार्थ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच चौथी व सातवी स्कॉलरशिप च्या विद्यार्थ्यांना जे पात्र झालेले आहेत त्यांना शाळेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. हे सत्कार समारंभ मुख्याध्यापक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. मुख्याध्यापक व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शैक्षणिक शिक्षणाबरोबर दिनियात परीक्षेतही सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. या कार्यक्रमाला शिक्षक व इतर कर्मचारी हे उपस्थित होते.

### हिसार हैदराबाद व अमृतसर-नांदेड एक्सप्रेस पुर्णा मार्गे धावणार

**परभणी,/प्रतिनिधी -** भुसावळ विभागातील भादली स्थानक परिसरात पाचव्या रेल्वेमार्गाच्या कामासाठी प्री-नॉन इंटरलॉकिंग आणि नॉन इंटरलॉकिंगची कामे हाती घेण्यात येत आहेत. या कामामुळे ११ ऑगस्ट २०२६ रोजी धावणाऱ्या दोन महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांचे मार्ग तात्पुरते बदलण्यात आल्याची माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाच्या जनसंपर्क विभागाने दिली आहे.




## के. के. एम. महाविद्यालयात आयसी आयसीआय बँकेचा प्लेसमेंट ड्राइव्ह संपन्न

**मानवत,/प्रतिनिधी-** के. के. एम. महाविद्यालय, मानवत येथील करिअर कट्टा व प्लेसमेंट सेल आणि आयसीआयसीआय बँक यांच्या संयुक्त विद्यमाने पदवीधर विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विशेष प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयसीआयसीआय बँकेचे व्यवस्थापक (ग्लोबल आउटसोर्सिंग, पुणे) श्री. गणेश शहाणे उपस्थित होते. तसेच उपप्राचार्य डॉ. के. जी. हुगे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. कैलास बोरुडे आणि करिअर कट्टा व प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. डॉ. पंडित मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रा. डॉ. पंडित मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्लेसमेंट ड्राइव्हच्या उद्देशाची माहिती दिली. त्यानंतर श्री. गणेश शहाणे यांनी विद्यार्थ्यांना आयसीआयसीआय बँकेतील विविध पदे, करिअरच्या संधी, भरती प्रक्रिया, आवश्यक कौशल्ये तसेच निवड प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी ऑनलाइन परीक्षेची माहिती देत, त्यामधून पात्र उमेदवारांची पुढील निवड प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

### सिध्देश्वर धरणातील पाणीसाठा २१ टक्के

**परभणी,/प्रतिनिधी**

सिद्धेश्वर धरणातील जिवंत पाणीसाठा सध्या २१.२२ टक्क्यांवर असून बुधवारी (५ ऑगस्ट) सकाळी ६ वाजेपर्यंत धरणातील जिवंत पाणीसाठा १७.१८१ दलघमी इतका नोंदविण्यात आला आहे.

धरणाची एकूण पाणीसाठा क्षमता २५०.८५ दलघमी असून त्यापैकी मृत पाणीसाठा १६९.८९ दलघमी आणि जिवंत पाणीसाठा ८०.९६ दलघमी आहे. सध्या धरणातील एकूण पाणीसाठा १८७.०७१ दलघमी असून पाणीपातळी ४१०.९०० मीटर इतकी आहे. गेल्या २४ तासांत धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून ०.९३७ दलघमी आवक झाली असून एकूण आवक ७६.७३८ दलघमी इतकी नोंदविण्यात आली आहे. धरण परिसरात आज ५ मिमी पावसाची नोंद झाली असून यावर्षीचा एकूण पाऊस ४७६ मिमी झाला आहे.

## बोंदरगाव येथे नैसर्गिक शेतीशाळा संपन्न




**सोनपेठ, /प्रतिनिधी-** महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने क्रॉपसॅप अंतर्गत नैसर्गिक शेतीशाळा २०२६-२७ अंतर्गत सोयाबीन पिकावरील नैसर्गिक शेतीशाळेचा दुसरा वर्ग सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी तालुक्यातील बोंदरगाव येथे उत्साहात पार पडला.

यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

शेतीशाळा कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी श्रीमती प्रियांका कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावर्षी सोनपेठ तालुक्यात नैसर्गिक शेतीशाळेसारखा शेतकरी हिताचा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, शेतकऱ्यांचा त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.या शेतीशाळेचे आयोजन सहायक कृषी अधिकारी बालासाहेब शिनगारे यांनी केले. त्यांनी सोयाबीन पिकातील नैसर्गिक शेती पद्धती, जीवामृत, कीड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन, चिकट सापळ्यांचा वापर, पिकांचे नियमित निरीक्षण, तसेच कमी खर्चात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन करून त्यांच्याशी सखोल चर्चा करण्यात आली.या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी कैलास गायकवाड, उप कृषीधिकारी दिनकर नागरगोजे व श्रीकांत पवार यांचे विशेष सहकार्य लाभले.यावेळी माजी सरपंच सुभाष पानखडे, सिद्धेश्वर कांबळे, शाम सपकाळ, राजकुमार पुरंदर, बालाजी सपकाळ, लहुदास सपकाळ, पांडुरंग वानखडे, विकास ढमे, आसाराम काळे, गणेश सपकाळ, गावच्या कृषी सखी अल्का सपकाळ व मीरा पानखेडे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.कार्यक्रमात नैसर्गिक शेतीच्या विविध तंत्रज्ञानावर सखोल चर्चा करण्यात आली. शेवटी शेतकऱ्यांनी अशा शेतीशाळांचे आयोजन सातत्याने करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# खोटे मृत्यू प्रमाणपत्र सादर करून शासनाची २३.४० लाखांची फसवणूक; ११ जणांविरुद्ध गुन्हा

**परभणी ,/प्रतिनिधी-:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणीकृत कामगारांचे खोटे मृत्यू प्रमाणपत्र तयार करून शासनाकडून मृत्युपश्चात मिळणारा लाभ बेकायदेशीरपणे उचलत २३ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सरकारी कामगार अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून पूर्णा तालुक्यातील धानोरा मोत्या व गौर येथील ११ जणांविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सरकारी कामगार अधिकारी तात्याराव कराड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना विविध योजनांअंतर्गत आर्थिक लाभ दिला जातो. सर्व अर्ज ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जात असून, पडताळणीनंतर मंजुरी मिळाल्यावर लाभाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. मे २०२३ ते जून २०२४ या कालावधीत पूर्णा तालुक्यातील धानोरा मोत्या व गौर येथील काही व्यक्तींनी १० नोंदणीकृत बांधकाम कामगार जिवंत असतानाही त्यांना मृत दाखवून खोटे मृत्यू प्रमाणपत्र व बनावट वारसदारांची कागदपत्रे सादर केली. त्याआधारे मृत्युपश्चात मिळणारा प्रति कामगार २ लाख ३४ हजार रुपयांचा लाभ मंजूर करून एकूण २३ लाख ४० हजार रुपये स्वतः च्या खात्यात वळते करून शासनाची फसवणूक केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

या प्रकरणात संबंधित ग्रामसेवकांकडून अहवाल मागविण्यात आला होता. आरोपींपैकी लक्ष्मण बाबुराव टाक यांनी घेतलेली लाभाची रक्कम परभणी येथील कार्यालयात परत केली असून, इतरांनी रक्कम परत न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी धानोरा मोत्या येथील लक्ष्मण बाबुराव टाक, बालाजी रामजी पांचाळ, बालाजी भीमराव कदम, अण्णाराव धोंडीबा भालेराव, माणिक महादू डरांगे, मिराबाई देविदास पांचाळ, मुक्ताबाई नामदेव डाखोरे तसेच गौर येथील दिगंबर व्यंकटी जोगदंड, मुरलीधर नारायण जोगदंड, ज्ञानोबा चुडामणी पारवे आणि सुमनबाई बालाजी पांचाळ यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३(५), ३१६(२), ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८ आणि ३३९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत केंद्रे करीत आहेत.

दरम्यान, परभणी जिल्ह्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे मोठ्या संख्येने बांधकाम कामगार नोंदणीकृत आहेत. या योजनेंतर्गत सुरक्षा साहित्य, पाल्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत, अपघात, अपंगत्व व मृत्युपश्चात आर्थिक सहाय्य यांसह विविध लाभ थेट बँक खात्यात दिले जातात. या प्रकारामुळे योजनांच्या अंमलबजावणीत गैरव्यवहार झाल्याची शक्यता व्यक्त होत असून, या प्रकरणाकडे गंभीरतेने पाहिले जात आहे.

